। लातूर । वर्ष ३४ वे । अंक ३०३ वा । गुरूवार, दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)     कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## टिपू सुलतानाने ७५ हजार हिंदूंची कत्तल केली, पण आपल्याला वर्षानुवर्षे खोटा इतिहास शिकवला गेला: देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** टिपू सुलतान हा चांगला होता की नाही, नंतरची गोष्ट आहे. पण आमचा आक्षेप या गोष्टीवर आहे की, कोणीतरी म्हणते टिपू सुलतान छत्रपती शिवरायांपेक्षा मोठे राजे होते. छत्रपती शिवरायांइतके गुणगान टिपू सुलतानाचे केले पाहिजे, असे म्हटले जाते, या गोष्टीवर आमचा आक्षेप आहे. गेली अनेक वर्षे देशाच्या इतिहासाशी छेडछाड करण्यात आली, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ते गुरुवारी विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत बोलत होते. यावेळी त्यांनी टिपू सुलतान आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या तुलनेच्या मुद्द्यावरुन विरोधकांना प्रत्युत्तर दिले.



गेली अनेक वर्षे या देशाच्या इतिहासाशी छेडछाड करण्यात आली. वर्षानुवर्षे आपल्याला हे शिकवण्यात आले की, टिपू सुलतान हे महान राजे होते. पण टिपू सुलतानाने ७५ हजार हिंदू आणि ३३ हजार नायरांची कत्तल केली, हे कधी शिकवण्यात आले नाही. ते इंग्रजांशी का लढले हे कोणी सांगितलं नाही. टिपू सुलतान स्वत:चं राज्य वाचवायला इंग्रजांशी लढला, हे आपल्याला कधीच सांगण्यात आले नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

आता खरा इतिहास समोर येत आहे. वर्षानुवर्षे देशात एनसीआरटीच्या पुस्तकात मोघली साम्राज्याला १७ पानं देण्यात आली, छत्रपती शिवाजी महाराजांविषयी या पुस्तकात एकच परिच्छेद होता. आता मोदी सरकारने एनसीआरटीच्या पुस्तकात मराठ्यांच्या इतिहासाला २० पाने दिली आहेत. योग्यवेळी नीट इतिहास शिकवला असता तर आज देशातील एकाही मुसलमानाने औरंगजेबाला हिरो म्हटले नसते. पण आपण खरा इतिहास कधीच शिकवला नाही. या देशात राष्ट्रभक्त मुसलमान आहेत. मला त्यांच्याविषयी कुठलाही आक्षेप नाही. पण जे लोक देशाच्या विरोधकांना आणि आक्रमणकाऱ्यांना हिरो मानतील, त्यांना आम्ही सोडणार नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी ठणकावून सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात विरोधी पक्षांना लक्ष्य केले. विरोधी पक्ष हा भ्रमित आणि संभ्रमित आहे, असे दिसते. माझी त्यांना सूचना आहे की, भ्रमात राहून धावण्यापेक्षा संभ्रमातून बाहेर पडण्यासाठी शांतपणे विचार करुन मुद्दे मांडले पाहिजेत. जेणेकरुन महाराष्ट्राच्या हितात तुमचे योगदान वाढेल. ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था, विकसित भारत, महाराष्ट्राची वाटचाल याबाबत विरोधी पक्षाच्या मनात गल्लत आहे. त्यांनी हा विषय नीट समजून घेतलेला नाही, किंवा त्यांना तो समजलाय पण त्यांना जनतेला संभ्रमित करायचे आहे. आम्हाला मनात कुठेही शंका नाही, महाराष्ट्र देशातील पहिली सब नॅशनल ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी होईल. भारत ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था होईल, ४ ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा आताच पार केला आहे. महाराष्ट्र ही देशातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. आपण दरवर्षी ३ लाख ६० हजार कोटींचा जीएसटी जमा करतो. जीएसटीबाबत दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आपल्या आसपासही नाही. कृषी निर्यात आणि सेवा क्षेत्रातही महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. महाराष्ट्राने जीडीपीच्या तुलनेत कर्जाच्या गुणोत्तराचे प्रमाणही उत्तम ठेवले आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## भारताच्या लेकीने पाकिस्तानला जगासमोर सुनावले, तुम्हाला मिळणाऱ्या भिकेपेक्षा काश्मीरचे बजेट...

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संयुक्त राष्ट्राच्या मानवाधिकार परिषदेच्या ५५ व्या सत्रात पाकिस्तानने काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला. त्यावेळी भारताच्या प्रतिनिधी अनुपमा सिंह यांनी पाकिस्तानला तिखट शब्दांत गोष्टी सुनावल्या आणि पाकिस्तानची लक्तरे शब्दांनी जगासमोर टांगली. पाकिस्तान ला ला लँड अर्थात अस्तित्वात नसलेल्या जगात आहे असे म्हणत पाकिस्तानला आरसा दाखवण्याचे काम केले.

भारताच्या प्रतिनिधी अनुपमा सिंह यांनी पाकिस्तानच्या आर्थिक परिस्थितीवर थेट प्रहार केला. पाकिस्तानला कदाचित या गोष्टीचा सामना करणे कठीण जाईल पण मी त्यांना हे सांगू इच्छिते की एकट्या जम्मू काश्मीरच्या विकासाचं बजेट हे त्यांच्या पूर्ण देशाच्या बेलाऊट पॅकेजच्या दुपटीहून अधिक आहे. पाकिस्तान मदत मिळावी म्हणून कटोरा घेऊन खचऋच्या समोर उभा आहे. तसंच पाकिस्तान एक प्रकारच्या ला-ला लँड म्हणजेच अस्तित्त्वात नसलेल्या जगात जगतो आहे.वास्तवात जगात काय चाललं आहे हे त्यांना ठाऊकही नसावे. अशा शब्दात त्यांनी पाकिस्तानवर जोरदार टीका केली आहे. पाकिस्तानच्या अब्रूची लक्तरे त्यांनी जगाच्या वेशीवर टांगली आहेत.

**अनुपमा सिंह यांची OIC वरही टीका**

भारताच्या प्रतिनिधी अनुपमा सिंह यांनी इस्लामिक संघटना OIC वरही टीका केली. पाकिस्तान हा देश जखउ ने राबवलेल्या प्रपोगंडाचा गुलाम झाला आहे. ही संघटना म्हणजे पाकिस्तानातील राजकीय तडजोडीसारख्या चुका करणारी एक संघटना ठरली आहे. पाकिस्तान हा देश आणि त्यांचे प्रतिनिधी त्यांच्या मनाला येईल तशा गोष्टी बोलत असतात, त्यांना कुठलाही आधार नसतो. पाकिस्तानने कितीही अपप्रचार केला तरीही काही उपयोग होणार नाही. पाकिस्तानचे हे म्हणणे आहे की जम्मू काश्मीरचे १९४७ मध्ये भारतात विलिनीकरण अयोग्य होते. पाकिस्तानने आमच्याच देशात पाकव्याप्त काश्मीरमध्ये बेकायदेशीर रित्या कब्जा केला आहे आणि आता आम्हाला नावे ठेवत आहेत. जम्मू काश्मीरमध्ये जे मतदान झाले त्यात लोकांनी पाकिस्तानच्या दहशतवादाला आणि हिंसेला नाकारले आहे. जम्मू काश्मीरच्या लोकांना विकास हवा आहे. त्यामुळे तिथले लोक लोकशाहीचा मार्ग स्वीकारत आहेत असंही अनुपमा सिंह यांनी म्हटले आहे.

**भारताच्या लेकीचं कौतुक**

पाकिस्तान हा देश IOC या संघटनेच्या हातचे बाहुले झाला आहे. राजकीय फायदा व्हावा म्हणून या संघटनेचा वापर सोयीस्करपणे केला जातो आहे. संघटनाही पाकिस्तान सरकारचा वापर करते आहे. अनुपमा सिंह यांनी हे विधान केल्यामुळे आणि पाकिस्तानला सुनावल्यामुळे पाकिस्तानची जगासमोर लाज निघाली आहे. अनुपमा सिंह यांनी असंही म्हटले की जगातला सर्वात मोठा रेल्वे ब्रिज चिनाब नदीवर आहे. जर पाकिस्तानला तो दिसत नसेल तर ते खरोखर आभासी जगात जगत आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेत पाकिस्तानने काश्मीरचा प्रश्न उपस्थित केला. त्यावेळी भारताच्या लेकीने त्यांना असे उत्तर दिले की त्यांची बोलतीच बंद झाली. शिवाय जगासमोर लाज गेली ती वेगळीच. अनुपमा सिंह यांचा व्हिडीओ व्हायरल झाला असून सोशल मीडियावर भारताच्या लेकीचं सगळेच जण कौतुक करत आहेत.



## रेणापूर डीसीसी बँक लुटण्याचा प्रयत्न फसला

### सुरक्षा रक्षकाचे हात पाय बांधले, सायरन वाजताच साहित्य जागीच टाकून चोरटे पसार

**लातूर/प्रतिनिधी** :रेणापूर-पिंपळफाटा महामार्गावरील लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (डिसीसी) शाखेत बुधवारी मध्यरात्री चोरट्यांनी दरोडा टाकण्याचा प्रयत्न केला. गॅस कटरने लोखंडी दरवाजे तोडून चोरटे तिजोरीपर्यंत पोहोचले होते; मात्र बँकेच्या आधुनिक सुरक्षा यंत्रणेचा सायरन वाजल्याने चोरट्यांचा हा डाव फसला. घाईघाईत गॅस कटरसह इतर साहित्य जागीच टाकून चोरटे अंधाराचा फायदा घेत पसार झाले.

२५ फेब्रुवारीच्या पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास ३ ते ४ अज्ञात चोरट्यांनी बँकेच्या मागील बाजूचे दोन दरवाजे गॅस कटरने कापून आत प्रवेश केला. यावेळी तिथे कर्तव्यावर असलेले सुरक्षा रक्षक महादेव बंडे यांना चोरट्यांनी मारहाण केली आणि त्यांचे हातपाय बांधून तोंडात बोळा कोंबला. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर आणि 'एलसीबी'चे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी भेट दिली. लातूरहून पाचारण करण्यात आलेल्या श्वान पथकाने बँकेपासून काही अंतरापर्यंत माग काढला. प्राथमिक अंदाजानुसार चोरटे खाजगी वाहनातून आले होते. पोलिसांनी परिसरातील महामार्गावरील इतर सीसीटीव्ही तपासत आहेत.

**श्वान पथक आणि ठसे तज्ज्ञांकडून तपास**

यंत्रणेमुळेच बँकेतील रक्कम राहिली सुरक्षित पहाटे ३.२० ला सायरनचा मेसेज आला. वॉचमनशी संपर्क न झाल्याने आम्ही तत्काळ पोलिसांना कळवले. आधुनिक सुरक्षा यंत्रणेमुळेच बँकेतील रक्कम सुरक्षित राहिली असून सीसीटीव्ही फुटेजवरून तपास सुरू आहे.

**- दत्तात्रय पवार,**
**शाखा व्यवस्थापक, रेणापूर.**

रोज वाचा
ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com

### प्रभात किरणे

धनासाठी जोडती नाती
धनासाठी तोडती नाती
धनाच्या आहारी
जाई मती न कळे,होई
आयुष्याची माती
- इंजि. नागनाथ
कलवले, लातूर

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



'न्याय भ्रष्टाचार' प्रकरण असलेल्या पुस्तकाच्या विक्रीवर बंदी...



### चिमटा दयाचा

एजंटाच्या मध्यस्थीने
कामे त्वरीत होतात !
तरी तो बदनाम ठरतो !!
काम न करणारे,
कार्यालयात आरामात
राहणारे मजेत दिसतात!!!

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा हरंगुळ ग्रामस्थांच्यावतीने सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील हरंगुळ जिल्हा परिषद गणातून काँग्रेसकडून भागीरथी शिवानंद पाटील या बहुमतांनी निवडून आल्याबद्दल राज्यांचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांची भेट घेवून मंगळवारी हरंगुळ ग्रामस्थांच्या वतीने आशियाना निवासस्थानी शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य परमेश्वर वाघमारे नूतन जिल्हा परिषद चे मिस्टर शिवानंद पाटील, दयानंद पाटील ,सूर्यकांत पाटील, वीरभद्र चीत कुटे ,नागेश चितकुटे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑल इंडिया पॉवर लिफ्टिंग स्पर्धेसाठी दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीच्या कु. वैष्णवी व कु. विशाखा यांची निवड



**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत कार्यरत दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, लातूर येथील बी.फार्मसी द्वितीय वर्ष कु. वैष्णवी व बी फार्मसी चतुर्थ वर्षात शिकत असलेल्या कु. विशाखा यांची ऑल इंडिया पॉवर लिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सदर स्पर्धा चेन्नई येथे आयोजित करण्यात येणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील ही अत्यंत उल्लेखनीय व अभिमानास्पद कामगिरी मानली जात आहे. क्रीडा प्राध्यापक ऋषिकेश मस्के यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली या विद्यार्थिनींनी ही उल्लेखनीय यशस्वी कामगिरी साध्य केली आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. ललितभाई शहा व मा. रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे व मा. अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी निवड झालेल्या विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी या निवडीबद्दल आनंद व्यक्त करून विद्यार्थिनींचे विशेष कौतुक केले आहे.

## उदगीर ग्रामीण पोलिसांची कारवाई, १० लाख ३० हजार ८०० रुपयांचा अवैध गुटखा व चारचाकी वाहन जप्त; एकाला घेतले ताब्यात

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात अवैध व्यवसायांवर आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाकडून सातत्याने प्रभावी कारवाई करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध गुटखा वाहतुकीवर पोलिसांनी धाडसी कारवाई करत मुद्देमाल जप्त केला आहे. या बाबत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनला त्यांच्या हद्दीत अवैधरित्या गुटखा वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. सदर माहितीची दखल घेऊन पोलीस अधीक्षक अमोल तांबे अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात पोलीस



ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांनी पथकाला संशयित वाहनाचा शोध घेऊन आवश्यक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

पोलीस पथकाने परिसरात नमूद वाहनांचा शोध मोहीम सुरू केली. दरम्यान नाईक चौक परिसरात संशयित वाहन दिसून आल्यानंतर पोलिसांनी ते अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र वाहन चालकाने पोलिसांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून वाहन थेट पोलिसांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न करत पळून जाण्याचा प्रयत्न केला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तत्काळ पाठलाग सुरू केला आणि अखेर नागलगाव परिसरात सदर वाहन अडवून पकडण्यात यश मिळवले. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये आखीब (वय २७ वर्ष, रा. मदिना नगर, उदगीर) हा इसम आढळून आला. पोलिसांनी त्याच्याकडे चौकशी केली असता तो महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला तंबाखूजन्य पदार्थ असलेला विमल नावाचा गुटखा वाहतूक करत असल्याचे निष्पन्न झाले. पुढील चौकशीत सदर माल फिरोज (रा. नळेगाव) यांच्याकडे देण्यासाठी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी घेऊन जात असल्याची माहिती आरोपीने दिली.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी अंदाजे २,८०,८००/- किमतीचा प्रतिबंधित गुटखा, टोयोटा कंपनीची इटिऑस चारचाकी अंदाजे किंमत ७,५०,०००/- असा एकूण १०,३०,८००/- किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण येथे गुन्हा क्रमांक ९३/२०२६ नोंद करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १२३, २७४, २७५, २२३ तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रायपाल्ले हे करीत असून या अवैध गुटखा पुरवठा साखळीतील इतर संबंधित आरोपींचा शोध घेतला जात आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलाकडून अवैध धंदे, प्रतिबंधित पदार्थांची वाहतूक व सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करणाऱ्या कृत्यांवर कठोर कारवाई सुरूच राहणार आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## शेतकरी, निसर्गाच्या संकटात सापडले

शेतकरी पुन्हा निसर्गाच्या संकटात सापडला आहे. वर्षातून असे संकट सतत येत असल्याने आर्थिक जीवन जगावे कसे असा प्रश्न निर्माण होत आहे. नुकतेच वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपिटीने मराठवाड्यातील बीड, लातूर, परभणी, नांदेड, धाराशिव तसेच विदर्भातील यवतमाळ, वर्धा जिल्ह्यात सोमवारी सुमारे ३७, ८५८ हेक्टरवरील पिके, फळांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या जिल्ह्यांत गहू, ज्वारीचे पीक आडवे झाले. काढून ठेवलेला हरभरा भिजला. द्राक्षालाही मोठा फटका बसून भाजीपाला खराब झाला. सर्वात मोठे नुकसान या अवकाळी पावसाने झाले आहे. त्यापेक्षाही आंब्याचा मोहोर झडला. याचे पडसाद म्हणून विधिमंडळ अधिवेशनात शेतकऱ्यांना तत्काळ मदतीची मागणी झाली आहे आता सरकार कोणते पावुल उचलते हे पाहाणे बाकी आहे. या बाबत महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, नुकसान झालेल्या जिल्ह्यांत तातडीने सर्वेक्षण, पंचनामे केले जातील. दरम्यान, मंगळवारी मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्रात, कुठेही जोरदार पाऊस किंवा गारपीट झाली नाही. भाजपचे औसाचे आमदार अभिमन्यू पवार यांनीही सरकारी मदतीची मागणी केली. सोमवारी पाऊस, गारपिटीमुळे ज्या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे आणि ज्यांनी पीक विमा काढला आहे त्यांना उंबरठा उत्पन्नावर आधारित भरपाई मिळणार आहे. त्यामुळे ज्या प्रमाणात उंबरठा उत्पन्न कमी येईल त्या प्रमाणात नुकसान भरपाई मिळेल. या वर्षी पीक विमा कंपनीला नुकसानीची सूचना देण्याची गरज नाही असे सांगितले जाते. याशिवाय नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरकारतर्फेही मदत केली जाते. त्यासाठी महसूलमंत्र्यांनी जाहीर केल्यानुसार महसूल विभाग, कृषी विभागामार्फत नुकसानीचे पंचनामे करून त्याचा अहवाल शासनाला पाठवला जाणार आहे. असेही समजते की, ३३ टक्क्यांहून अधिकचे नुकसान झाल्यास निधी मागणी केली जाणार असून शासनाकडून मदत मिळण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मंगळवारी विधानसभेत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ११,९९५.३४ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. यात महसुली खर्चासाठी ५,९९१.५४ कोटी आणि भांडवली खर्चासाठी ६,००३.७९ कोटींची तरतूद प्रस्तावित केली आहे. दरम्यान, राज्यावरील कर्ज ९ लाख कोटींवर गेल्याची माहिती समोर आली आहे. अपूर्ण सिंचन प्रकल्प मार्गी लावून नाबार्ड/निडाकडील कर्जाच्या व्याजापोटी २,२२,१९२.२ कोटी तर प्रधानमंत्री कृषी सिंचाई आणि बळीराजा जलसंजीवनी योजनेच्या कर्ज परतफेडीसाठी ७० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री वारकरी, ज्येष्ठ नागरिक महामंडळासाठी प्रत्येकी १० लाखांची तर नव्या वैद्यकीय महाविद्यालय स्थापना आणि एमबीबीएसच्या जागा वाढवण्यासाठी ८० लाख, छत्रपती संभाजीनगरातील दूध योजनेसाठी १० लाखांची मागणी करण्यात आली आहे. वास्तविक मागील भरपाई मिळालेली नाही. कर्जमाफीही नाही. त्यात हे नवे संकट ओढवले आहे. हवामान तज्ज्ञांनुसार बंगालच्या उपसागरात कमी दाबाच्या क्षेत्रामुळे विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाने हजेरी लावली. कमी दाबाचे हे क्षेत्र उत्तर पूर्वेकडे सरकल्याने बुधवारपासून आकाश निरभ्र राहिल. तापमानात वाढ होईल. सोलापूर आणि परिसरात मात्र तीन दिवस पाऊस राहणार असल्याचे सांगण्यात येते. निसर्गाचे संकट मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यावर कोसळत आहे. त्याच प्रमाणे चिंतेची बाब निर्माण झाली आहे. हाताचे येणारे पीक आडवे झाले आहे. अवकाळी पावसासोबत गारपीठीचा झटका बसला आहे. आंब्याचा मोहर व लहान कैऱ्याचा सडा राणात दिसून आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यावर हे संकट आहे. याला शासनाने मदत केली पाहिजे. शासनाने त्वरीत पंचनामे करणार आहेत असे सांगितले असले तरी पंचनामे होण्यास विलंब लागणार आहे. त्यानंतर त्याचा आवाहल शासन दरबारी जाईल. तेथे विचार होवून किती व कशाप्रकारे मदत करावयाची हे ठरविले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे या कारवाईस किती दिवस लागतील हे सांगता येत नाही. शासनाची घोषणा पंचनामे करावित अशी असली तरी प्रत्यक्षात किती दिवसात करावेत हे जाहिर नाही. वेळचे बंधन दिसून येत नाहीत. केवळ पंचनामे करावेत असेच सध्याला जाहिर झाल्याचे दिसून येत आहे. मुळात सरकारला सॅटेलाईट म्हणजे अवकाशातील उपग्रहाने बरीच माहिती मिळू शकते. त्यावर नुकसानची माहिती कळू शकते. पुर्वी सारखे पंचनामे करावेत. शेतात जावे असे नाही. आता विज्ञान एवढे प्रगत झाले आहे की, घरबसल्या माहिती मिळू शकते. घरबसल्या अनेक बाबी कळू शकतात. हे पंचनाम्याची जुनी पद्धत आहे. पंचनामे म्हणजे पाच जण त्या घटनेचे साक्षीदार असाच होतो. पंचासमोर घेतलेली माहिती, ही पद्धत जुनी आहे आता प्रगत व अचुक अशी माहिती मिळते. ड्रोनच्या साह्याने अचुक माहिती घेवू शकतोत. त्यामुळे नुकसान किती झाले हे सर्वांना कळते त्याप्रमाणात तातडीने मदत करण्यात दिरंगाई होते ही वस्तूस्थिती दिसून येते. त्यामुळे पंचनामे वगैरे प्रोसिजर चालुन ठेवण्याअगोदर तातडीने काही मदतीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी. तसे पाहिले तर आपघात झाल्यावर तातडीने मदत जाहिर केली जाते. दिली जाते. शेतकऱ्याचे नुकसान झाल्यावर लेन-देन प्रोसिजर दिसून येते ते योग्य नाही. जी काही मदत देणे उचित असते ती दिली पाहिजे. विनाकारण ताटकळत ठेवणे योग्य नाही. अवकाळी पावसाने नुकसान झाले का? ते झाले आहे तेही जगजाहिर झाले आहे. त्यामुळे मदत केली पाहिजे. आपला कृषीप्रधान देश आहे. आपल्या बहुसंख्यांचा व्यवसाय शेती आहे. मुळात भारत हा ग्रामीण भागात म्हणजे खेड्यात वसलेला देश आहे. शेतकऱ्यास पोशिंदा म्हणतात. यासर्वांची आठवण ठेवून मदतीची गरज आहे. विनाविलंब शेतकऱ्याच्या खात्यात मदतीची जी काही द्यायची रक्कम जमा केली पाहिजे. पंचनामे, चौकशी हा मदत लांबविण्याचा भाग दिसून येतो हे आता शेतकऱ्यास सर्वांना कळते. नुकसाने झाले ते जगजाहिर आहे, त्यामुळे मदत शेतकऱ्यास केली पाहिजे. ती शासनाने विनाविलंब केली पाहिजे. अर्थसंकल्पीय अधिवेशन चालू आहे यात निर्णय होणे अपेक्षित आहे.

# औषधी वनस्पतींचे संवर्धन ही लोकचळवळ व्हावी-राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

### शेगाव येथे राष्ट्रीय आरोग्य मेळावा; राष्ट्रपतींच्या हस्ते शुभारंभ




**बुलडाणा/प्रतिनिधी :** आयुर्वेद व योगशास्त्र ही भारतीय ज्ञान परंपरा जगाला स्वस्थ भविष्या'ची ग्वाही देणारी आहे. त्याचा अवलंब व प्रसार होत असतानाच, औषधी वनस्पतींचे संवर्धनही होणे आवश्यक आहे. हा केवळ शासनप्रशासनाचा उपक्रम न राहता लोकचळवळ व्हावी, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केले.

केंद्र शासनाचे आयुष मंत्रालय व अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्यातर्फे शेगाव येथील विसावा भक्तनिवास संकुल परिसरात आयोजित राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. राज्यपाल आचार्य देवव्रत, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, युवा कार्यक्रम व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील, आमदार संजय कुटे, आयुष मंत्रालयाचे सचिव पद्मश्री वैद्य राजेश कोटेचा, अ. भा. आयुर्वेद महासंमेलनाचे अध्यक्ष प्रो. राकेश शर्मा, महासंमेलन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. देवेंद्र त्रिगुणा आदी यावेळी उपस्थित होते.

राष्ट्रपती श्रीमती मुर्मू म्हणाल्या की, मन व शरीर या दोहोंचे संतुलन साधून संतुलित व आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा मंत्र योग व आयुर्वेदातून मिळतो. 'आरोग्यं परमं सुखम्' ही आपल्या संस्कृतीची शिकवण आहे. शरीर हे सर्व कर्तव्ये पूर्ण करण्याचे साधन आहे. देशाला सशक्त बनविण्यासाठी नागरिकांचे जीवन आरोग्यपूर्ण असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने योग, आयुर्वेद, युनानी आदी आयुष पद्धती महत्वाची भूमिका बजावतात.

आयुष मंत्रालयातर्फे अखिल भारतीय आयुर्वेद संस्थांची स्थापना, आयुष औषधालये, औषधे परीक्षण प्रयोगशाळा, वैश्विक पारंपरिक चिकित्सा केंद्राचे पुनरूज्जीवन अशी महत्वाची पावले उचलण्यात येत आहेत. याबरोबरच औषधी वनस्पतींचे संवर्धन, क्षेत्रविस्तार होणेही आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रयत्न व्हावेत, असे राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांनी यावेळी सांगितले.

राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले की, भारतीय आहारपद्धतीत पूर्वापार औषधी तत्वे असलेल्या वनस्पतींचा वापर होत आला आहे. व्यक्तीला कधीही आजारपण उद्भवू नये अशी सोय आपल्या पारंपरिक ज्ञानावर आधारित जीवनपद्धतीत होती. तथापि, आता आहारात अनावश्यक पदार्थांचा अंतर्भाव झाल्याने आजार वाढल्याचे दिसून येते. त्यामुळे आयुर्वेद व आयुष पद्धतींचा प्रसार आयुष मंत्रालयातर्फे होत आहे. तो अधिक व्यापक व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव म्हणाले की, निरामय जीवनशैली, 'वेलनेस' व 'समग्र स्वास्थ सुरक्षा' ही 'आयुष'ची आधारशीला आहे. जग आज 'वेलनेस'कडे वळले असून, भारतातील प्राचीन व पारंपरिक आयुष पद्धतीच्या संवर्धन व अवलंबामुळे आपला देश संपूर्ण जगात अग्रेसर ठरेल. औषधी वनस्पती उत्पादक शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ होईल. महाराष्ट्रातही वेगळे आयुष मंत्रालय असावे यासाठी प्रयत्न होत आहेत. आयुष चिकित्सा व उपचारपद्धतीचा लाभ विदर्भ व महाराष्ट्रातील गरजूंना मिळावा यासाठी हा राष्ट्रीय आरोग्य मेळावा शेगावात आयोजित केला असल्याचेही त्यांनी सांगितले.

पालकमंत्री श्री. जाधव पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. आयुर्वेद क्षेत्रासाठी योगदान देणाऱ्या ज्येष्ठ वैद्यांना यावेळी गौरविण्यात आले. गिनीज बुक ऑफ रेकॉर्डतर्फे आयुष मंत्रालयाला मिळालेले प्रमाणपत्र राष्ट्रपती महोदयांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. वैद्य श्री. कोटेचा यांनी प्रास्ताविक केले. अ. भा. आयुर्वेद महासंमेलनाचे महासचिव वैद्य एस. एन. पाण्डेय, मेळाव्याच्या आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. आशुतोष गुप्ता, महाराष्ट्र आयुर्वेद संमेलनाचे अध्यक्ष वैद्य सतीश भट्टड, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधिक्षक नीलेश तांबे आदी उपस्थित होते.

**मेळाव्याची प्रमुख वैशिष्ट्ये –**

* देशातील प्रख्यात तज्ज्ञ डॉक्टरांद्वारे नागरिकांची विनामूल्य आरोग्य तपासणी व आयुष पद्धतीने औषधोपचार
* विविध आयुष औषध उत्पादक कंपन्या, सरकारी संस्था, संशोधन केंद्र आणि नामांकित महाविद्यालयांच्या वतीने महत्वपूर्ण माहिती देणारे कक्ष
* वनौषधी प्रदर्शन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ (नागार्जुन वनौषधी उद्यान) यांच्या सौजन्याने दुर्मिळ वनौषधींचे दर्शन व शेतक-यांसाठी कार्यशाळा
* आयुष चिकित्सा पद्धतीवर विद्यार्थी, डॉक्टर, सामान्य नागरिक यांच्यासाठी विविध माहितीपूर्ण व्याख्याने

**नियोजित कार्यक्रम :**

* दि.२६ फेब्रुवारी दुपारी १२ वा. प्रशिक्षण, घरचा वैद्य आजीबाईंचा बटवा घरगुती आयुर्वेदिक प्रथमोपचाराचे प्रशिक्षण. दुपारी ३ वाजता कार्यशाळा शेतकरी बांधवांसाठी वनौषधी लागवड, प्रक्रिया व विपणन
* दिनांक २७ फेब्रुवारी सकाळी १० ते ४ वाजता शिबिर : वयोश्री व तपासणी आणि साहित्य वाटप शिबिर, दिव्यांग व्यक्तींची आरोग्य तपासणी व साहित्य नोंदणी. सकाळी ११ वा. : व्याख्यान-शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रबोधन
* दिनांक २८ फेब्रुवारी सकाळी १० ते ३ वाजता शिबिर- मोफत नेत्रतपासणी व चष्मे वाटप, मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी नोंदणी शिबिर.

# विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकासाला प्राधान्य द्यावे : कोषाध्यक्ष संजय बोरा

### – दयानंद वाणिज्य महाविद्यालयात व्हर्व्ह जिल्हास्तरीय स्पर्धेचे शानदार उदघाटन
### – तीन दिवस चालणार स्पर्धा; जिल्हाभरातून १२२६ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**लातूर/प्रतिनिधी :** स्पर्धेच्या युगात शिक्षणासोबतच कौशल्ये विकसित करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकासाला प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन दयानंद शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष संजय बोरा यांनी केले. दयानंद वाणिज्य महाविद्यालयात व्हर्व्ह २०२५-२६ या जिल्हास्तरीय स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले. यावेळी ते उदघाटक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद शिक्षण संस्थेचे सदस्य डॉ. सुरेश भट्टड, विशाल अग्रवाल, सौ. अग्रवाल, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, व्हर्व्ह स्पर्धा आयोजक डॉ. लक्ष्मीकांत सोनी आदींची उपस्थिती होती. २०१४ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात व्हर्व्ह ही स्पर्धा आयोजित केली जाते. या अंतर्गत पोस्टर प्रेझेंटेशन, बिझनेस क्विझ, बेस्ट आऊट ऑफ वेस्ट, टॅली टॅलेंट हंट, अप्टिट्यूट ॲबिलिटी आणि ॲड-ओ-मेनिया आदी स्पर्धाचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना स्वतःमध्ये असणारे कौशल्ये सादर करता यावे, या हेतूने या स्पर्धेचे आयोजन केले जाते. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर, रेणापूर, निलंगा, शिरूर अनंतपाळ यासह लातूर शहरातील विविध महाविद्यालयातील एकूण १ हजार २२६ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला आहे. ही स्पर्धा २५ ते २७ फेब्रुवारी दरम्यान चालणार असून, २७ फेब्रुवारी रोजी या स्पर्धेतील विजेत्यांना गौरविण्यात येणार आहे.

यावेळी डॉ. सुरेश भट्टड यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांचे प्रोत्साहन वाढविले. अध्यक्षीय समारोपात बोलताना प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर म्हणाले, दयानंद वाणिज्य महाविद्यालय नेहमीच अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांना हक्काचे व्यासपीठ निर्माण करून देते. सध्याच्या स्पर्धेच्या युगात अशा उपक्रमातून नक्कीच विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल. प्रास्ताविक डॉ.लक्ष्मीकांत सोनी यांनी केले आणि स्पर्धा आयोजनामागील आपली भूमिका विषद केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अक्षय पवार, प्रा.अजय चव्हाण यांनी तर शेवटी आभार डॉ. आकांक्षा भांजी यांनी मानले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाकरिता व्हर्व्ह आयोजक डॉ. लक्ष्मीकांत सोनी, समितीतील सदस्य प्रा. दगडू शेख, डॉ. आकांक्षा भांजी, प्रा. सुहाना शेख, डॉ. प्रेमसागर मुंदडा, प्रा. स्नेहल पाटील, प्रा. प्रसाद पाटील, प्रा. ज्योती महावरकर, प्रा. क्षितिज कांबळे आदी परिश्रम घेत आहेत. परीक्षक म्हणून डॉ. पांडुरंग पवार, प्राचार्य डॉ. सचिन प्रयाग, डॉ. पुष्पलता कावळे-त्रिमुखे, डॉ. बालाजी कळंबे हे काम पाहत आहेत.

## डोळ्यांचा कर्करोग: वेळीच निदान झाल्यास दृष्टी आणि जीव वाचू शकतो, या आजाराबाबत महत्वाच्या गोष्टी

कर्करोग किंवा घातकता ही केवळ विकसित देशांमध्येच नाही तर आजकाल विकसनशील देशांमध्येही एक नवीन साथीची रोग आहे. डोळा हा आपल्या शरीराचा एक लहान पण अतिशय महत्त्वाचा अवयव असल्याने त्याच्याकडे ही लक्ष देणे आवश्यक असल्याची माहिती नेत्ररोग तज्ञ डॉ. सोनल अशोक एरोळे यांनी दिली. वेळीच निदान झाल्यास आपण या आजारातून दृष्टी आणि जीव वाचू शकतो. जाणून घेऊयात याबाबत सविस्तर माहिती.

डोळ्यांच्या दुर्धर आजारामध्ये पुढील सर्वात महत्वाच्या गोष्टींचा समावेश होतो:

१) रेटिनोब्लास्टोमा
२) पापण्यांचा बेसल सेल कार्सिनोमा
३) कोरॉइडचा घातक मेलेनोमा.
४) ऑप्टिक नर्व्ह मेनिन्जिओमास आणि ग्लिओमास
५) कंजंक्टिव्हलचा स्क्वॅमस सेल कार्सिनोमा
६) लॅक्रिमल ग्रंथीचा घातकपणा

कर्करोगाचे वेळीच निदान झाल्यास त्यावर उपचार करता येतात आणि दृष्टी आणि जीवन वाचवता येते. मुलांमध्ये दिसणारा रेटिनोब्लास्टोमा हा पॅपिलेडेमा वर्गातील पांढऱ्या प्रतिक्षेपाने शोधला जाऊ शकतो किंवा मुलांच्या डोळे मिचकावण्याच्या वर्तनाने देखील त्याचे निदान केले जाऊ शकते. कर्करोग किंवा घातकता ही केवळ विकसित देशांमध्येच नाही तर आजकाल विकसनशील देशांमध्येही त्याच प्रमाण वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

डोळ्यांच्या कर्करोगासाठी जोखीम घटक पुढील प्रमाणे आहेत.

१) अनुवांशिक घटक
२) डोळ्याचा फिकट रंग
३) वय: रेटिनोब्लास्टोमा वगळता वृद्ध लोकांमध्ये या आजाराची शक्यता जास्त असते.

लक्षणे आढळल्यास घातक घटकांचा शोध घेतला जाऊ शकतो.

१) दृष्टी बदलणे उदाहरणार्थ, हळूहळू किंवा अचानक दृष्टी कमी होणे, प्रकाश चमकणे
२) बुबुळाच्या रंगात बदल (पॅपिलरी भागात गडद किंवा हलके ठिपके दिसणे)
३) पापण्यांच्या भागात किंवा ग्रंथीच्या भागात दिसणारी कोणतीही गाठ किंवा तीळ ज्याचा आकार वाढत आहे.
४) डोळ्यांच्या बुबुळाच्या पुढील भागाच्या किंवा डोळ्याच्या पांढऱ्या भागाच्या रंगात कोणताही बदल

डोळ्यांच्या कर्करोगाचे निदान खालील प्रकारे करता येते:

१) डोळ्यांची तपासणी
२) डोळ्यांचे अल्ट्रासाऊंड
३) एमआरआय आणि अगदी पीईटी स्कॅन सारख्या इमेजिंग पद्धती
४) काही मासांना निदानासाठी एक्सिजन बायोप्सीची आवश्यकता असते.

कर्करोगाच्या प्रकारानुसार उपचार पर्याय बदलतात, शस्त्रक्रियेपासून केमोथेरपी आणि रेडिओथेरपीपर्यंत

निष्कर्षाअंती असे दिसून येते की, डोळ्यांचा कोणताही घातक रोग, जर लवकर आढळला तर, दृष्टी कमी होण्यापासून थांबवू शकतो किंवा जीवही वाचवू शकतो. दृष्टीसाठी, नंतर पुनर्वसन आवश्यक असते, परंतु लवकर निदान होणे देखील महत्वाचे आहे.

## मधुमेह आहे? ही लक्षणे चुकुनही दुर्लक्ष करु नका; हार्ट फेल्युअरचा धोका दुपटी-चौपटीने वाढेल, काय करावे, काय टाळावे?

मधुमेह हा केवळ रक्तातील साखरेचे प्रमाण वाढण्याचा आजार नसून संपूर्ण शरीरावर त्याचा दुष्परिणाम होतो. हृदयावर त्याचा परिणाम अधिक गंभीर मानला जातो. आजच्या घडीला जगभरातील अनेक संशोधनांमधून स्पष्ट झाले आहे की मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्ये हार्ट फेल्युअरचा धोका सामान्य व्यक्तींच्या तुलनेत दुप्पट ते चौपट जास्त असतो. त्यामुळे या दोन्ही अवस्थांमधील परस्परसंबंध समजून घेणे अत्यंत आवश्यक असल्याचं मुंबईतील सर एच. एन. रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथील कार्डियाक सर्जन डॉ. बिपीनचंद्र भामरे यांनी सांगितलं.

मधुमेह आणि हृदय विकाराच्या समस्या यांचा परस्परसंबंध असून मधुमेहींनी त्यांचे हृदय निरोगी कसे ठेवता येईल याकिरता विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. हार्ट फेल्युअर तेव्हा होते जेव्हा हृदय प्रभावीपणे रक्त पंप करू शकत नाही, ज्यामुळे थकवा येणे, दम लागणे आणि पाय किंवा गुडघ्यांमध्ये सूज येते. त्याच्या कारणांमध्ये कोरोनरी धमनी रोग, उच्च रक्तदाब किंवा कालांतराने हृदयाच्या स्नायूंचे नुकसान होते. ही स्थिती हळूहळू विकसित होते म्हणून वेळीच हृदय तपासणी करणे गरजेचे आहे.

**मधुमेहामुळे येतो हृदयविकाराचा झटका**

मधुमेहामुळे शरीराच्या रक्तातील साखरेचे नियमन करण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. विविध अभ्यासांनुसार, कालांतराने रक्तातील साखरेचे प्रमाण वाढल्यास हृदयावर नियंत्रण ठेवणाऱ्या रक्तवाहिन्या आणि नसांवर दुष्परिणाम होतो. कालांतराने, यामुळे रक्तवाहिन्या कडक होणे, रक्त प्रवाह कमी होणे आणि हृदयविकाराचा धोका वाढतो. मधुमेह असलेल्या लोकांना उच्च कोलेस्ट्रॉल आणि उच्च रक्तदाबाची समस्या असू शकते, ज्यामुळे भविष्यात हृदयविकाराची शक्यता वाढते.

हृदयविकाराची लक्षणांमध्ये दम लागणे, सतत खोकला येणे, पाय किंवा पोटाला सूज येणे आणि अचानक थकवा येणे यांचा समावेश आहे . त्याचप्रमाणे जास्त तहान लागणे, वारंवार लघवी होणे आणि अंधुक दृष्टी यासारख्या मधुमेहाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका, कारण या दोन्ही स्थिती घातक ठरू शकतात.

**काय करावं काय टाळावं?**

मधुमेह आणि हृदयविकार यांचा परस्परसंबंध असून मधुमेहाचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि हृदयाच्या समस्यांपासून दूर राहण्यासाठी, नियमित तपासणी करून आणि डॉक्टरांनी सांगितलेल्या औषधांचे नियमित सेवन करुन रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करणे गरजेचे आहे. ताजी फळे, भाज्या, तृणधान्य, डाळी आणि मसूर यांचा समावेश असलेला संतुलित आहार घ्या. दररोज किमान एक तास न चुकता व्यायाम करा, धूम्रपान आणि मद्यपानाचे सेवन टाळा, योगा आणि ध्यान यासारख्या विश्रांती तंत्रांचा सराव करा. दर ८ ते १० महिन्यांनी किंवा डॉक्टरांनी सांगितल्यानुसार नियमित हृदयरोग तपासणी करणे गरजेचे आहे. जर तुम्हाला मधुमेहाचे निदान झाले, तर तुम्ही तुमच्या हृदयाच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्या व कोणतीही असामान्य लक्षणं आढळल्यास त्वरीत वैद्यकिय सल्ला घ्या.

# विरोधी पक्षनेत्याविना अधिवेशन, दादांची उणीव!

राज्य विधिमंडळाचे अंदाजपत्रकी अधिवेशन काल (सोमवार)पासून मुंबईत सुरू झाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाची दु:खद छाया या अधिवेशनावर आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अजित पवार यांच्यासह दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करून सभागृहाचे काम तहकूब करण्यात आले. गेली ३६ वर्ष सभागृहाचे सदस्य असलेले, विविध पदे भूषवणारे, आपल्या खात्याचे कामकाज नसले तरी पूर्ण काळ सभागृहात बसणारे अजित पवार यावेळी सभागृहात असणार नाहीत. १९९१ मध्ये बारामती लोकसभेची जागा शरद पवारांसाठी रिकामी करून पोटनिवडणुकीद्वारे विधानसभेत दाखल झालेल्या अजित पवारांची अनुपस्थिती सर्वांनाच जाणवणारी आहे. त्यांच्या विमान अपघाताबाबत अनेक प्रश्न सध्या उपस्थित केले जात आहेत. या अपघाताला विमानात अचानक निर्माण झालेला तांत्रिक बिघाड कारणीभूत ठरला, की वैमानिकाची चूक? हाच प्रश्न सुरुवातीला उपस्थित झाला होता; परंतु विमान कंपनीच्या अक्षम्य निष्काळजीपणाचे अनेक दाखले पुढे यायला लागल्याने हा खरेच अप-घात होता, की घातपात असा संशय व्यक्त केला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व रोहित पवार यांनी हा विषय उचलून धरला आहे. स्वाभाविकच अधिवेशनातही चौकशीची मागणी होईल. नागरी उड्डान विभागाकडून सुरू असलेल्या चौकशीचा प्राथमिक अहवाल आला, तर सरकारने याबाबत निवेदन करण्याची मागणी जोर धरण्याची शक्यता आहे. ३६ वर्षांत प्रथमच अजित पवार सभागृहात दिसणार नाहीत, तर दुसरीकडे त्यांच्यानंतर उपमुख्यमंत्री पदासह पक्षाची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेणार्या सुनेत्रा पवार प्रथमच विधिमंडळात येणार आहेत. त्यांच्याकडून लगेच फार मोठ्या अपेक्षा करणे चुकीचे ठरणार असले तरी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाची धुरा त्या समर्थपणे सांभाळू शकतील का ? अशी शंका कोणाला असेल तर त्याचा अंदाज येणार आहे.



निव्वळ टोलवाटोलवी

तीन तपानंतर अजितदादांचे नसणे जसे जाणवणार आहे, तसेच महाराष्ट्र विधिमंडळाच्या इतिहासात प्रथमच दोन्ही सभागृहांत विरोधी पक्षनेत्यांचे नसणेही या अधिवेशनात जाणवणार आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर १५ वी विधानसभा अस्तित्वात आली. सरकार सत्तारूढ झाल्यानंतर पहिल्या अधिवेशनात विरोधी पक्षनेत्याची निवड होते. मात्र, विरोधी बाकावरील सर्वांत मोठ्या पक्षाच्या सदस्यांची संख्या ही एकूण विधानसभा सदस्य संख्येच्या १० टक्के नसल्याने विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय अजूनही प्रलंबित आहे. अंबादास दानवे निवृत्त झाल्यानंतर विधानसभेप्रमाणे विधानपरिषदेतही विरोधी पक्षनेत्याची नियुक्ती झालेली नाही. जेव्हा जेव्हा हा विषय उपस्थित झाला, तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय हा विधानसभा अध्यक्ष आणि विधानपरिषद सभापतींच्या अखत्यारीतला असल्याचे सांगून हात वर केले, तर विधानसभा अध्यक्ष रा-हुल नार्वेकर विरोधी पक्षनेतेपदाबाबत नियमांचा अभ्यास सुरू असल्याचे सांगतात. विधानसभेत शिवसेना (ठाकरे) पक्षाचे २० आमदार आहेत. काँग्रेसचे १६ व शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे १० आमदार आहेत. महाविकास आघाडीच्या या तिन्ही पक्षांकडून विरोधी पक्षनेतेपदासाठी भास्कर जाधव यांच्या नावाची शिफारस करणारे पत्र ४ मार्च २०२५ रोजी देण्यात आले. या पत्राला पुढील महिन्यात एक वर्ष पूर्ण होईल. एकूण रागरंग बघता या अधिवेशनातही निर्णय होण्याची शक्यता कमीच आहे. त्यामुळे सोमवारपासून सुरू होणारे अंदाजपत्रकी अधिवेशनसुद्धा विरोधी पक्षनेत्याविनाच पार पडेल, अशी चिन्हे आहेत.

तसा नियमच नाही

खरे तर विरोधी पक्षनेतेपदासाठी किमान १० टक्के सदस्य असण्याची तरतूद घटनेत किंवा विधानसभेच्या नियमात नाही. यासाठी लोकसभेचे पहिले अध्यक्ष दादासाहेब मावळणकर यांनी दिलेल्या एका निर्णयाचा ७० वर्षांनी आधार घेतला जात आहे. १९६२ च्या विधानसभा निवडणुकीत केवळ १५ आमदार असलेल्या शेतकरी कामगार पक्षाचे कृष्णराव धुळप विरोधी पक्षनेते झाले होते. दि.बा. पाटील, उत्तमराव पाटील, गणपतराव देशमुख, मृणाल गोरे, निहाल अहमद अशी अनेक नावे आहेत जे पक्षाचे १० टक्के आमदार नसतानाही विरोधी पक्षनेते झाले होते. दिल्ली विधानसभेच्या २०२० च्या निवडणुकीत आम आदमी पार्टीचे ६० पैकी ५७ आमदार निवडून आले होते. तरीही त्यांनी तीन आमदार असलेल्या भाजपला विरोधी पक्षनेतेपद दिले होते. दादासाहेब मावळणकर अध्यक्ष असताना किमान गणपूर्ती पुरते सदस्य ज्यांच्या पक्षात आहेत अशा नेत्याला विरोधी पक्ष नेतेपद देण्यात यावे असे निर्देश दिले. तेव्हा विरोधी पक्ष नेत्याला वैधानिक दर्जा नव्हता. १९७८ मध्ये विरोधी पक्षनेता वेतन आणि भत्ते हे विधेयक आले व त्यानंतर या पदाला मंत्र्याचा दर्जा मिळाला. काँग्रेसच्या काळात जनता दलाचे निहाल अहमद, मृणाल गोरे, दत्ता पाटील यांच्या पक्षाची सदस्य संख्या ही १० टक्क्यांपेक्षा कमी होती, तरी देखील ते विरोधी पक्षनेते बनले. अर्थात त्या काळातील राजकारण वेगळे होते. खरेतर अनेक समित्यांवर विरोधी पक्ष नेता सदस्य असतो. त्यामुळे हे पद रिक्त असणे फारसे योग्य नाही. नोटांपासून नावांपर्यंत सगळे बदलणार्या लोकांनी पुराणातल्या सोईच्या गोष्टी मात्र जपून ठेवल्या आहेत. नेहरूंच्या काळात झालेला असूनही मावळणकरांचा निर्णय त्यांनी जपून ठेवला आहे.

लढाईसाठी भरपूर 'दारूगोळा'

विरोधी पक्ष नेतापद मिळेल, की नाही या गोष्टीत विरोधी पक्ष देखील अडकून पडला आहे. ते वैधानिक पद आहे, त्याला एक दर्जा आहे, विशेषाधिकार आहेत हे जितके खरे, तितकेच हे देखील खरे आहे की सभागृहातील साध्या सदस्यालाही आपल्या कुठल्याही अन्य बाकावर बसून महत्त्वाचे विषय तेवढ्याच तीव्रतेने मांडता येऊ शकतात. शिवसेनेचे एकमेव आमदार असताना छगन भुजबळ यांचे नाव त्यांच्या आक्रमकतेमुळे महाराष्ट्रभर पोचले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील विजयामुळे या अधिवेशनात सत्ताधारी पक्षाचा आत्मविश्वास व विरोधकांची निराशा वाढलेली असू शकेल. विरोधकांचे संख्याबळ व मनोबल घटलेले असले तरी सत्ताधार्यांमधील सुप्त संघर्षामुळे सरकारला घेरण्यासाठी विरोधकांकडे अनेक विषय त्यांच्या हातात आले आहेत. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लाचखोरीचे प्रकरण, अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या खात्यातील अधिकार्यांनी २५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक दर्जा देण्यासाठी केलेले प्रताप, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची वादग्रस्त प्रकरणे असे अनेक विषय विरोधकांकडे आहेत. त्याचा कसा उपयोग केला जातो ते दिसेलच.

आर्थिक आव्हाने

विरोधक क्षीण झाल्यामुळे सरकारपुढे फार मोठी राजकीय आव्हाने उरलेली नाहीत; मात्र आर्थिक आघाडी सांभाळताना सरकारची कसोटी लागणार आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी जाहीर केलेल्या लोकप्रिय योजनांनी अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर अर्थखाते मुख्यमंत्र्यांनी स्वत:कडे ठेवले आहे. ६ मार्च रोजी ते राज्याचे अंदाजपत्रक सादर करणार आहेत. राज्यावरील कर्जाचा बोजा, विविध योजनांमुळे पडणारा आर्थिक ताण अशी अनेक आव्ह-ाने अर्थमंत्री म्हणून फडणवीसांसमोर असणार आहेत. राज्यावरील कर्जाचा बोजा ९ लाख ३२ हजार कोटींवर गेला आहे. जूनपर्यंत शेतकरी कर्जमाफीचा निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. शेतकर्यांना दिलेला शब्द पाळायचा असेल, तर अंदाजपत्रकात भरीव तरतूद करावी लागेल. यावर्षीचे अंदाजपत्रक सादर होईल तेव्हा सरकारचा इरादा स्पष्ट होईल. आश्वासनांची पूर्तता करताना अर्थव्यवस्थेची घसरलेली गाडी रुळावर आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांना प्रचंड कसरत करावी लागणार आहे.

## वास्तव्याची जाण

एका राज्याचा राजा दररोज सकाळी फेरफटका मारण्यासाठी जात होता. त्याला रस्त्यात जी व्यक्ती पहिल्यांदा दिसेल त्याची तो प्रत्येक इच्छा पूर्ण करायचा. असेच एका दिवशी निघाला असता त्याला एक ब्राह्मण भेटला. राजाने त्याला विचारले की, ब्राह्मण देवता मी आपली काय मदत करु. ब्राह्मण लाजून म्हणाला, महाराज आपण जे उचित समजाल त्यावर राजा म्हणाला, आपण सांगा काय पाहिजे. ब्राह्मणाच्या मनात लोभ आला. तो राजला म्हणाला, महाराज आपण फिरून या तोपर्यंत मी विचार करतो की, मला काय पाहिजे. ब्राह्मणाचे म्हणणे ऐकून राजा फिरण्यासाठी गेला. नंतर ब्राह्मणाच्या मनात विचार आला की, अशी संधी पुन्हा-पुन्हा मिळत नाही. एकदाच असे काही तरी मागतो की, पुन्हा कधी काही मागण्याची गरज पडणार नाही. राजा फिरून आला व त्याने ब्राह्मणाला त्याची इच्छा विचारली. तेव्हा ब्राह्मणने राजाला पूर्ण राज्य मागीतले. राजानेही ताबडतोब यासाठी होकार दिला व ब्राह्मणाला म्हणाला, मी तर अनेक दिवसांपासून याची प्रतिक्षा करत होतो की या ओझ्यातून केव्हा मुक्त होईल. आपण येथेच थांबा मी राज्याचा कारभार आपल्याकडे सोपवण्याची व्यवस्था करतो. असे म्हणून राजा महालात जातो. राजाचे म्हणणे ऐकून ब्राह्मण चिंतेत पडतो. त्याला वाटत नव्हते की, राजा एवढ्या सोप्या पद्धतीने राज्य सोपवून देईल. ब्राह्मणाच्या मनात ईश्वरीय भावना जागृत झाली आणि त्याने विचार केला की, वास्तविकतेमध्ये वैरागी तर राजा



आहे. मी तर फक्त ढोंग करतो. हा तर मोहापासून दूर आहे. ब्राह्मणाला वास्तव्याची जाण झाली आणि तो तिथून निघून गेला. त्याला आपल्या मोहावर पश्चाताप झाला.



## मेंदूच्या आजारांची प्रमुख लक्षणे

तीव्र आणि सतत डोकेदुखी: ही लक्षणे ट्रींशल-रीश कैळिंरश्री, इरपसरश्रीश आणि तशुिशश्रश्र क्शरश्रींह च्या मते, मेंदूच्या ट्यूमर किंवा संसर्गाचे प्रमुख लक्षण असू शकते।
स्मृतीभ्रंश आणि गोंधळ: गोष्टी विसरणे, नवीन माहिती समजण्यास कठीण जाणे आणि निर्णय घेण्याची क्षमता कमी होणे (डिमेंशिया)।
चक्कर येणे आणि शरीराचा समतोल जाणे: चाल-ताना अडखळणे किंवा चक्कर येणे।
दृष्टी किंवा ऐकण्यात बदल: अंधुक दिसणे किंवा ऐकू न येणे।फीट किंवा झटके अच-ानक शारीरिक हालचालींवर ताबा न राहणे किंवा बेशुद्ध पडणे।मानसिक किंवा वर्तणुकीतील बदल: चिडचिड होणे, उदासीनता किंवा स्वभावात अचानक मोठे बदल दिसणे।
स्नायूंची कमकुवतपणा: हात किंवा पाय लुळे पडणे, बोलण्यात अडखळणे (उदा. स्ट्रोक किंवा गंभीर आजार)।

## उपदेशकथा :व्यवहारबुद्धी

एका गावामध्ये दृढ मैत्री असलेले चार ब्राह्मण पूत्र राहात होते. त्यापैकी तिघांनी शास्त्राची खूप घोकंपट्टी केली. पत्रव्यवहार, बुद्धी त्यांना अजिबात नव्हती. चौथा बुद्धिमान होता. त्याने कुठल्याच शास्त्राचा अभ्यास नुसत्या घोकंपट्टीने केला नव्हता. ते चौघे एकदा द्रव्य मिळविण्याच्या इच्छेने राजाकडे निघाले. वाटेत एका अरण्यात त्यांना सिंहाची हाडे दिसली. त्यापैकी एकाने हाडे गोळा करून सिंहाचा सांगाडा विद्येच्या सामर्थ्याने बनविला. दुसऱ्याने आपल्या विद्येने त्यात रक्त, मांस, कातडे घातले व तिसरा त्यात जीव ओतणार तोच बुद्धिमान असा चौथा म्हणाला, अरे थांब, हा सिंह जिवंत झाला तर आपणा सर्वांना खाऊन टाकील. त्यावर तिसरा म्हणाला, मूर्खा माझी विद्या मी अशी फुकट जाऊ देणार नाही. बुद्धिमान म्हणाला, मग थांब मी झाडावर चढतो मग त्यात जीव ओत. त्याप्रमाणे तो झाडावर चढल्याबरोबर तिसऱ्याने त्यात जीव ओतला. जिवंत झाल्याबरोबर सिंहाने डरकाळी फोडून तिघांनाही ठार केले. सिंह निघून गेल्यानंतर चौथा सावकाशपणे झाडावरून खाली उतरला.

---

**कथा उपदेश : शास्त्राचा वापर व्यवहारबुद्धीने करावा.**

### १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

**डार्क चॉकलेट**–डार्क चॉकलेट निश्चित रूपानं तुमच्या त्वचेकरता लाभदायक आहे. कॉकोया फ्लावानोल सारख्या अँटीऑक्सीडेंट ने भरलेले असल्याने डार्क चॉकलेट तुमच्या त्वचेला हाइड्रेट ठेवते शिवाय साफ आणि स्वस्थ ठेवण्यात साहाय्यक आहे. कॉकोया तुमच्या त्वचेला मुलायम बनवतं आणि सोबतच चेहे-यावर सुरकुत्या सुध्दा लवकर येउ देत नाही परंतु तुम्ही याचे सेवन जास्त प्रमाणात करू नका रोज एका सिमीत मात्रेत याचे सेवन करणे निश्चितच तुमच्याकरता फायदयाचे राहील.




### २ Joke — विनोद




बाबू – तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू – माझ्याच वयाचे आहेत.
बाबू – अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू – का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना बस!

### ३ Message — संदेश



Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .

### ४ Thought — सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.– **डॉन प्याट**


**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रिय:।।**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

## महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तर

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तर

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालह-वाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त



### खायला मागवले, ते खाल्ले आणि पोटात गडबड झाली; न्यूझीलंडचा कर्णधार सँटनरने सांगितला किस्स

दिल्ली,२५ फेब्रुवारी –'भूक लागली होती, मी एका ॲपच्या माध्यमातून मागवले. ते आले. मी खाल्ले आणि माझे पोटच बिघडले', असे न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरने सांगितले. सँटनर वर्ल्डकप मोहिमेदरम्यान कॅनडाविरुद्धचा सामना खेळू शकला नाही. त्याचं कारण त्याने उलगडले.काही वर्षांपूर्वी विदेशी खेळाडूंना भारत दौऱ्यात इथल्या खाद्यपदार्थांचा सामना करणं कठीण जायचं. मात्र आता अनेक संघ स्वतंत्र पोषणआह–ारतज्ज्ञ आणतात. अनेक संघ त्यांना हवे तसे जेवण मिळावं यासाठी शेफलाच घेऊन येतात. भारतातल्या पंचतारांकित हॉटेलांमध्येही आता जगभरातील सगळे पदार्थ मिळू लागले आहेत.भारतात खेळताना फिरकीला साथ देणाऱ्या खेळपट्ट्या, प्रचंड उकाडा, भारतीय चाहते या सगळ्याच्या बरोबरीने मसालेदार पदार्थांचा सामना करणं विदेशी खेळाडूंना कठीण जात असे.

### तिलक वर्मा, वॉशिंग्टन सुंदर आऊट आणि संजू सॅम सन,अक्षर पटेल आत?

चेन्नई–टी २० वर्ल्ड कप सध्या रोमांचक स्थितीत पोहोचला आहे. आशिया संघातील किमान एक संघ तरी उपांत्य फेरीत पोहोचणार की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. बांगलादेश भारतात न खेळण्याच्या भूमिकेमुळं टी २० वर्ल्ड कप बाहेर गेला. आता पाकिस्तान, श्रीलंका आणि भारत यांचा उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी संघर्ष सुरु आहे. सुपर ८ च्या ग्रुप १ मध्ये भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात उद्या सामना होणार आहे. भारताला हा सामना मोठ्या फरकानं जिंकावा लागणार आहे. या मॅचसाठी भारतीय संघात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. झिम्बाब्वे विरुद्ध भारतीय संघात संजू सॅमसन, अक्षर पटेल यांना संधी मिळू शकते. तर, तिलक वर्मा, वॉशिंग्टन सुंदर यांना बाहेर ठेवलं जाऊ शकतं अशी शक्यता आहे. रिंकू सिंग वैयक्तिक कारणामुळं संघासोबत नसल्यानं त्याच्या जागी कोणाला संधी द्यायची हा प्रश्न संघ व्यवस्थापनासमोर असू शकतो. भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील भारतात खेळवला जाणारा हा पहिला टी २० सामना असेल. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारताचा ७६ धावांनी पराभव झाला होता.

### ...तरच भारत सेमी फायनल खेळू शकेल

मुंबई–आयसीसी पुरुष टी ट्वेंटी वर्ल्डकपमध्ये सुपर ८ फेरीचे सामने सुरू आहेत. ग्रुप एक मध्ये वेस्ट इंडिज (धावगती +५,३५०) पहिल्या, दक्षिण आफ्रिका (धाव–गती +३,८००) दुसऱ्या, भारत (धावगती –३,८००) तिसऱ्या आणि झिम्बाब्वे (धावगती –५.३५०) चौथ्या क्रमांकावर आहे. वेस्ट इंडिजने झिम्बाब्वे विरुद्धचा सामना १०७ धावांनी तर दक्षिण आफ्रिकेने भारताविरूद्धचा सामना ७६ धावांनी जिंकला आहे. आता गुरुवार २६ फ ेब्रुवारी रोजी दुपारी तीन वाजता वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सामना होणार आहे. हा सामना दक्षिण आफ्रिकेने जिंकला आणि भारताने त्याच दिवशी संध्याकाळी सात वाजताच्या सामन्यात झिम्बाब्वेचा पराभव केला तर भारताच्या सेमी फायनल खेळण्याच्या आशा जिवंत राहतील. भारताला झिम्बाब्वेविरुद्ध जिंकल्यानंतर रविवार १ मार्च रोजी वेस्ट इंडिज विरुद्धची मॅच पण जिंकावी लागेल. वेस्ट इंडिजचा आफ्रिकेविरुद्ध पराभव तसेच भारताचा झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिज या दोन

## भारत संघाची 'करो या मरो'ची आवस्था

### टीम इंडियाने बॉलिंग करावी की बॅटिंग? झिम्बाब्वे विरूद्धच्या सामन्यात खेळपट्टी कोणाला साथ देणार?

**चेन्नई:** सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळत असलेला भारतीय संघ सुपर ८ फेरीतील दुसऱ्या सामन्यात झिम्बाब्वेचा सामना करण्यासाठी मैदानात उतरणार आहे. हा सामना २६ फेब्रुवारीला चेन्नईतील एमए चिंदबरम स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. भारतीय संघाने साखळी फेरीतील चारही सामन्यांमध्ये विजय मिळवला होता. पण सुपर ८ फेरीत भारताला अपेक्षेप्रमाणे सुरूवात करता आलेली नाही. दक्षिण आफ्रिकेविरूद्ध झालेल्या सामन्यात भारतीय संघाला ७६ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. दरम्यान झिम्बाब्वेविरूद्ध होणाऱ्या सामन्यात खेळपट्टी कोणाला साथ देणार? जाणून घ्या पिच रिपोर्ट.

भारतीय संघाने आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत ज्या ज्या खेळपट्टीवर फलंदाजी केली आहे, त्या खेळपट्टीवर फलंदाजी करणं मुळीच सोपं राहिलेलं नाही. भारतीय संघात एकापेक्षा एक स्टार फलंदाज आहेत. पण एकही फलंदाज मनमोकळेपणाने फलंदाजी करू शकलेला नाही. सर्व फलंदाज संघर्ष करताना दिसून आले आहेत. चेपॉकची खेळपट्टी ही



**हा सामना २६ फेब्रुवारीला चेन्नईतील एमए चिंदबरम स्टेडियमवर खेळवला जाणार**

स्लो असते. त्यामुळे झिम्बाब्वेच्या ब्लेसिंग मुजारबानी आणि सिकंदर रझासारख्या खेळाडूंसाठी हे फायदेशीर ठरू शकतं. तसेच ही खेळपट्टी फिरकी गोलंदाजांसाठीही फायदेशीर ठरते. टाईम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, वर्ल्डकप स्पर्धेला सुरूवात होण्यापूर्वी मैदानाची खुदाई करण्यात आली होती. गेल्या ५ महिन्यांपासून या खेळपट्टीवर एकही सामना खेळवण्यात आलेला नाही. त्यामुळे ही खेळपट्टी पूर्णपणे ताजी असणार आहे. या खेळपट्टीवर चेंडू बॅटवर चांगल्याप्रकारे येत आहे. याआधी न्यूझीलंड आणि अफगाणिस्तान या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यादरम्यान अफगाणिस्तानने पहिल्या डावात फलंदाजी करताना १८२ धावांचा डोंगर उभारला होता. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या न्यूझीलंडने हे आव्हान अवघ्या १७.५ षटकात पूर्ण केलं होतं. त्यानंतर यूएईविरूद्ध झालेल्या सामन्यात न्यूझीलंडने १७५ धावांचे आव्हान १५.२ षटकात पूर्ण केले होते. याच मैदानावर खेळताना कॅनडाच्या युवराज सामराने दमदार शतकी खेळी केली होती.चेपॉकच्या मैदानावरील खेळपट्टी ही फिरकी गोलंदाजांसाठी फायदेशीर ठरते. पण यावेळी उलट चित्र पाहायला मिळालं आहे. आतापर्यंत झालेल्या सामन्यांमध्ये प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघांनी १९६ आणि २०० धावांचा यशस्वी बचाव केला आहे. त्यामुळे कुठलाही कर्णधार नाणेफ ेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेऊ शकतो. भारतीय संघात एकापेक्षा एक स्फोटक फलंदाज आहेत. त्यामुळे सूर्यकुमार यादव नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेऊ शकतो. भारतीय फलंदाज मोठी धावसंख्या उभारून झिम्बाब्वेला लवकरात लवकर ऑलआऊट करण्याचा प्रयत्न करतील.

## पाकिस्तानच्या टीममध्ये उभी फूट... शाहिन आफ्रिदी–बाबरमध्ये काय झाले? ड्रेसिंग रूममध्ये सगळेच बिथरले!

मुंबई–टी–२० वर्ल्ड कपच्या सुपर–८ मध्ये पाकिस्तानचा इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात २ विकेटने विजय झाला. इंग्लंडविरुद्धच्या पराभवानंतर पाकिस्तानचे सेमी फायनलला पोहोचणे कठीण झाले आहे, त्यातच त्यांच्या टीममधले वादही चव्हाट्यावर येऊ लागले आहेत. मॅचनंतर झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये शाहिन आफ्रिदीला बाबरबद्दल प्रश्न विचारण्यात आला, त्यावर आफ्रिदीने दिलेल्या उत्तराने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात पहिले बॅटिंग करताना पाकिस्तानने १६४ रन केले, या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडची अवस्था खराब झाली होती, पण कर्णधार हॅरी ब्रुकच्या शतकामुळे इंग्लंडने हा सामना जिंकला. इंग्लंडविरुद्धच्या या पराभवानंतर पाकिस्तानच्या टीममध्ये उभी फूट पडल्याचे



चित्र आहे. भर पत्रकार परिषदेमध्ये पाकिस्तानचा फास्ट बॉलर शाहिन आफ्रिदीने बाबर आझमच्या बॅटिंगवर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला आहे.शाहिन आफ्रिदीला बाबर आझमच्या पार्टनरशीपबद्दल प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा 'टी–२० क्रिकेटमध्ये पार्टनरशीप करताना तुम्हाला मोठा शॉट मारल्यानंतर एक–दोन रन काढाव्या लागतात, त्यामुळे प्रत्येक ओव्हरला ८–९ रन येतील', असे शाहिन आफ्रिदी म्हणाला आहे. शाहिन आफ्रिदीचं हे वक्तव्य म्हणजे बाबर आझमवर निशाणा असल्याचं बोललं जात आहे, कारण बाबरने या सामन्यात चौथ्या क्रमांकावर बॅटिंगला येऊन २४ बॉलमध्ये २५ रनची संथ खेळी केली, ज्यावरून त्याच्यावर चौफेर टीका केली जात आहे.

या संपूर्ण स्पर्धेमध्ये बाबर आझमला संघर्ष करावा लागत आहे. बाबर आझमने या टी–२० वर्ल्ड कपच्या ४ इनिंगमध्ये २२.७५ ची सरासरी आणि ११२.३४ च्या स्ट्राईक रेटने ९१ रन केले आहेत, ज्यात ४६ रन हा त्याचा सर्वोत्तम स्कोअर आहे. या कामगिरीनंतर पाकिस्तानी चाहत्यांकडून बाबरला टीममधून बाहेर करण्याची मागणीही केली जात आहे.पाकिस्तान सेमी फायनलआधीच घरी? पाकिस्तानच्या सेमी फायनलला पोहोचण्याच्या मार्गात अडथळे निर्माण झाले आहेत.

## सलमान आघाच्या पत्नीसोबत घृणास्पद कृत्य, पाकिस्तानला सहन झाला नाही इंग्लंडविरुद्धचा पराभव

मुंबई–टी–२० वर्ल्ड कपच्या सुपर–८ सामन्यामध्ये पाकिस्तानचा इंग्लंडविरुद्ध २ विकेटने पराभव झाला आहे, या पराभवानंतर पाकिस्तानच्या टीमवर त्यांच्याच चाहत्यांकडून टीकेची झोड उठली आहे. टीमचा पराभव सहन न झाल्यामुळे पाकिस्तानी चाहत्यांनी कर्णधार सलमान आघा याची पत्नी आणि त्याच्या मुलांना शिवीगाळ केली आहे. या टीकेला सलमान आघाच्या पत्नीने प्रत्युत्तर दिलं आहे.

इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात पाकिस्तानचा २ विकेटने पराभव झाला, शेवटच्या ओव्हरमध्ये पाकिस्तानने सामना गमावला, त्यामुळे पाकिस्तानचं सेमी फायनलला पोहोचणं कठीण झालं, त्यामुळे हा पराभव पाकिस्तानी चाहत्यांना सहन झाला नाही आणि त्यांनी सलमान आघाच्या पत्न–ीला तिच्या सोशल मीडिया अकाऊंटच्या मेसेजमध्ये जाऊन शिवीगाळ केली.

सोशल मीडियावरून होत असलेल्या शिवीगाळीला सलमान आघाच्या पत्नीने प्रत्युत्तर दिलं आहे. सलमान आघाच्या पत्नीने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट केली आहे. 'मला आणि माझ्या मुलाला शिवीगाळ करून पाकिस्तान वर्ल्ड कप जिंकणार आहे का?' असा प्रश्न सलमान आघाच्या पत्नीने विचारला आहे.

## 'रणनीती आणि प्लेइंग इलेव्हनचा पुनर्विचार करण्याची गरज'

दिल्ली–२०२६ च्या टी–२० विश्वचषकात भारतीय संघाने फक्त एकच सामना गमावला आहे, परंतु या पराभवामुळे उपांत्य फेरीत पोहोचण्याचा त्यांचा मार्ग कठीण झाला आहे. सुपर ८ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पराभवानंतर, माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी एक महत्त्वपूर्ण विधान केलं आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा पराभव हा भारतासाठी धोक्याची घंटा होती असे शास्त्री मानतात आणि आता त्यांना त्यांच्या संघ संयोजनाचा पुनर्विचार करावा लागेल. तर वाईट दिवस अटळ असतो टीम इंडियाचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी म्हटले आहे की, ''जर तुम्ही सलग १२ सामने जिंकलात तर वाईट दिवस अटळ असतो, परंतु मला आनंद आहे की तो लवकर आला. हा भारतासाठी आवश्यक धोका होता. यासाठी आता संघाला त्यांच्या रणनीती आणि संयोजनाचा पुनर्विचार करावा लागेल. त्यांनी मागील अनुभवातून शिकले असेल की गोष्टी हलक्यात घेऊ नयेत. दुसरा सामना गमावल्याने खूप दबाव निर्माण होईल.''

रवी शास्त्री यांनीही टीम इंडियाला काही खास सल्ला दिला. ते म्हणाले, ''आता अक्षर पटेलला परत आणायला हवे. तुम्हाला त्याचा अनुभव हवा आहे. मी म्हणेन की अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर दोघेही खेळू शकतात, कारण एके दिवशी गोलंदाज फॉर्ममध्ये नसेल, जसे रविवारी वरुण चक्रवर्ती होता.''

## रिंकू सिंह झिम्बाब्वेविरुद्ध खेळेल की नाही? प्रशिक्षकांनी थेटच सांगितले

चेन्नई–भारतीय क्रिकेट संघासाठी एक आनंदाची बातमी आहे. टीम इंडियाचा विश्वासार्ह फिनिशर रिंकू सिंह आज संध्याकाळपर्यत (२५ फ ेब्रुवारी) पुन्हा संघात सामील होण्याची अपेक्षा आहे. ही माहिती टीम मॅनेजमेंटनं दिली आणि टीम इंडियाचं फलंदाजी प्रशिक्षक सीतांशू कोटक यांनी त्याच्या पुनरागमनाला दुजोरा दिला.

काय म्हणाले फलंदाजी प्रशिक्षक : सामन्यापूर्वी आज पत्रकार परषदेत फलंदाजी प्रशिक्षक कोटक म्हणाले, ''रिंकू सिंह बुधवारी संध्याकाळी परत येणार आहे. त्याचे वडील आजारी होते, म्हणून त्याला घरी जावं लागलं. आम्हाला आशा आहे की तो आज आमच्यात सामील होईल.''

कौटुंबिक कारणांमुळं रिंकूनं संघ सोडला होता, कारण त्याचे वडील आजारी होते. या काळात, खेळाडू त्याच्या कुटुंबासोबत राहिला. आता, परिस्थिती सुधारल्यानंतर, तो त्याच्या राष्ट्रीय कर्तव्यावर परतत आहे. मधल्या फळीत म



हत्त्वाची भूमिका : रिंकू लवकरच सराव सत्रात सामील होईल आणि त्याची लय परत मिळवेल अशी टीम मॅनेजमेंटला आशा आहे.

मधल्या फळीतील त्याची भूमिका महत्त्वाची मानली जाते, विशेषत: सामन्यांच्या शेवटच्या षटकांमध्ये जलद धावा करण्याच्या त्याच्या क्षमतेमुळे. सध्याच्या टी–२० विश्वचषकात रिंकू सिंगची बॅट शांत असली तरी, तो फलंदाजीत त्याचा जुना फॉर्म दाखवण्यात अपयशी ठरला आहे.

रिंकूनं टी–२० विश्वचषकात आतापर्यंत कशी कामगिरी केली : रिंकू सिंहनं या टी–२० विश्वचषकात टीम इंडियाच्या सर्व सामन्यांमध्ये भाग घेतला आहे, परंतु त्याच्या कमी फलंदाजी क्रमामुळं त्याला जास्त चेंडूंचा सामना करण्याची संधी मिळाली नाही. तो अमेरिका आणि नामिबियाविरुद्ध एकेरी अंकात बाद झाला. त्यानं पाकिस्तानविरुद्ध झटपट खेळ केला, ४ चेंडूत नाबाद ११ धावा केल्या. त्यानं नेदरलँड्सविरुद्ध ३ चेंडूत ६ धावा केल्या, तर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन चेंडू खेळल्यानंतर तो आपलं खातं उघडू शकला नाही. झिम्बाब्वेविरुद्ध रिंकूची आकडेवारी : झिम्बाब्वेविरुद्ध रिंकूची कामगिरी खूपच प्रभावी राहिली आहे. त्यानं आतापर्यंत ५ टी–२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, ४ डावांपैकी ३ वेळा नाबाद

## इंग्लंड सेमीफायनल गाठून देणाऱ्या कॅप्टन ब्रूकने असाही इतिहास रचला!

**दिल्ली**–इंग्लंडने टी–२० विश्वचषकात इतिहास रचला, सलग पाचव्यांदा उपांत्य फ ेरीत पोहोचला. मंगळवारी पाकिस्तानला २ विकेट्सने हरवून, संघ या आवृत्तीच्या उपांत्य फेरीत पोहोचणारा पहिला संघ बनला. इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रूक हा कर्णधार म्हणून टी–२० विश्वचषकात शतक करणारा पहिला फलंदाज ठरला. दरम्यान, पाकिस्तानचा बाबर आझम या स्पर्धेत सर्वात कमी स्ट्राईक रेट असलेला फलंदाज ठरला.

१. इंग्लंड सलग पाचव्यांदा उपांत्य फेरीत
इंग्लंड सलग पाचव्यांदा टी–२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत पोहा–ेचला. २०१६ ते २०२६ पर्यत संघ सलग पाच वेळा उपांत्य फेरीत पोहोचला आहे. यापूर्वी, पाकिस्तान आणि श्रीलंका प्रत्येकी चार वेळा अंतिम फेरीत पोहोचले होते, परंतु आता इंग्लंड आघाडीवर आहे.

२. शतक ठोकणारा ब्रूक हा पहिला कर्णधार
हॅरी ब्रूकने कर्णधार असताना पाकिस्तानविरुद्ध १०० धावा करून इतिहास रचला. तो टी–२० विश्वचषकात शतक ठोकणारा पहिला कर्णधार ठरला. यापूर्वी, ख्रिस गेलचा ९८ धावा हा सर्वोच्च धावसंख्या होता. ब्रूक टी–२० विश्वचषकात धावांचा पाठलाग करताना शतक ठोकणारा चौथा फलंदाजही ठरला.

३. ब्रूक, शतक करणारा दुसरा सर्वात जलद फलंदाज
५० चेंडूत शतक करणारा हॅरी ब्रूक, टी२० विश्वचषक इतिहासातील दुसरा सर्वात जलद शतक ठरला. तो फक्त क्रिस गेल (४७ चेंडू) च्या मागे आहे. ब्रूक इंग्लंडसाठी तिन्ही स्वरूपात शतके करणारा तिसरा खेळाडू देखील ठरला. त्याच्या आधी जोस बटलर आणि डेव्हिड मलान आहेत.

बाबर आझम: सर्वात कमी स्ट्राईक रेट असलेला फलंदाज
टी२० विश्वचषकात फलंदाजांकडून जलद



धावा करण्याची अपेक्षा असताना, बाबर आझमचा १११.५ चा स्ट्राईक रेट हा ५०० पेक्षा जास्त धावा करणाऱ्या खेळाडूंमध्ये सर्वात कमी आहे. या यादीत हाफीज, संगकारा आणि विल्यमसन सारखी मोठी नावे देखील आहेत, परंतु बाबर तळाशी आहे.

शाहीन: पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज
शाहीन आफ्रिदी टी२० विश्वचषक इतिहासात नवीन चेंडूने सर्वात धोकादायक गोलंदाज असल्याचे सिद्ध झाले आहे. त्याने पॉवरप्लेमध्ये १८ विकेट घेतल्या आणि या टप्प्यात सर्वाधिक विकेट घेण्याचा विक्रम केला.

पाकिस्तानमध्ये सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज
या टप्प्यात सर्वाधिक विकेट घेण्याचा विक्रम आता शाहीन आफ्रिदीच्या ना–वावर आहे. त्याने १०२ सामन्यांमध्ये १३५ विकेट घेतल्या आणि १३३ विकेट असलेल्या हरिस रौफला मागे टाकले. शादाब खान तिसऱ्या क्रमांकावर आहे, तर मोहम्मद नवाज आणि अनुभवी अष्टपैलू शाहिद आफ्रिदी हे देखील यादीत आहेत.



# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध

## जिल्हा पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांची ट्युशन एरिया भेटीदरम्यान वेणूताई गर्ल्स हॉस्टेलला भेट; ट्युशन परिसरातील अडचणी जाणून घेत दिले तात्काळ उपाययोजनेचे आदेश

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांनी ट्युशन एरिया भातीदरम्यान आज वेणूताई गर्ल्स हॉस्टेल येथे सदिच्छा भेट देत विद्यार्थिनींशी थेट संवाद साधला. विद्यार्थिनींच्या समस्या समजून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात आले.

लातूर शहर हे शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र असून राज्याच्या विविध भागांतून तसेच बाहेरगावाहून अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी येथे शिक्षणासाठी येत असतात. शिक्षणासोबतच सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी असल्याची जाणीव ठेवून जिल्हा पोलीस प्रशासनाकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांनी ट्युशन एरिया भेटीदरम्यान वेणूताई







गर्ल्स हॉस्टेल येथे थेट भेट देत तेथील विद्यार्थिनींशी संवाद साधला.

या भेटीदरम्यान विद्यार्थिनींनी ट्युशन क्लासला जाताना व परतताना येणाऱ्या अडचणींबाबत माहिती दिली. काही ठिकाणी अंधार, वाहतुकीची अडचण, संशयास्पद व्यक्तींची उपस्थिती किंवा सुरक्षिततेबाबत निर्माण होणारी चिंता यासंदर्भात विद्यार्थिनींनी आपली मते व्यक्त केली. पोलीस अधीक्षकांनी सर्व बाबी अत्यंत लक्षपूर्वक ऐकून आणि समजून घेतल्या.यावेळी त्यांनी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना ट्युशन परिसरात नियमित गस्त वाढविणे, संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवणे, विद्यार्थिनींना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे याबाबत सूचना दिल्या. तसेच कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण झाल्यास तात्काळ पोलीसांना कळविण्याचे आवाहन विद्यार्थिनींना करण्यात आले.

संवादादरम्यान पोलीस अधीक्षकांनी विद्यार्थिनींशी दिलखुलास चर्चा करत त्यांना त्यांचे उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देऊन अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी शिस्त, मेहनत आणि योग्य मार्गदर्शन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही प्रकारच्या भीती किंवा दबावाखाली न राहता आत्मविश्वासाने शिक्षण घ्यावे, पोलीस प्रशासन कायम तुमच्या पाठीशी आहे असा विश्वास त्यांनी विद्यार्थिनींना दिला.

ट्युशन परिसर भेटीदरम्यान वेणूताई गर्ल्स हॉस्टेल येथे झालेल्या या भेटीमुळे विद्यार्थिनींमध्ये पोलीस प्रशासनाबद्दल विश्वास व सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाल्याचे पाहावयास मिळाले. अनेक विद्यार्थिनींनी पोलीस अधीक्षकांनी स्वतः हॉस्टेलमध्ये येऊन संवाद साधल्याबद्दल समाधान व्यक्त केले. लातूर जिल्हा पोलीस दल हे महिला सुरक्षा व विद्यार्थ्यांच्या हितासाठी सतत तत्पर असून भविष्यातही अशा प्रकारचे लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## राजमाता जिजामाता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे 'एनएमएमएस' परीक्षेत यश



**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी शिष्यवृत्ती (एनएमएमएस) परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत येथील राजमाता जिजामाता विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखली असून सात विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

महेश बाळासाहेब मस्के हा विद्यार्थी ११० गुण मिळवत विद्यालयात प्रथम, हर्ष बालाजी कांबळे १०८ गुण मिळवत द्वितीय तर अदिती अविनाश लवटे ही १०२ गुण मिळवून विद्यालयात तृतीय आली आहे. या परीक्षेत अद्वैत अन्शीराम बल्लाळ याने ८६ गुण, सार्थक धनराज कराड ८१, तर साईनाथ दत्ता गोरे व अंकिता अमोल कंठाळे यांनी प्रत्येकी ७८ गुण मिळवत शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, पर्यवेक्षक एस. एम. गुरमे, पांडुरंग कुलकर्णी, मदन धुमाळ यांच्यासह अन्य शिक्षकांनी शाल, पुष्पहार देऊन कौतुक केले.

## संत गाडगेबाबा जयंती उत्साहात साजरी



**लातूर/प्रतिनिधी :** संत गाडगेबाबा चौक रिंग रोड येथे संत गाडगेबाबा जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मनपा नगरसेवक उद्धव तेलंगे यांच्या शुभहस्ते संत गाडगेबाबांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दीपक गंगणे हातिम भाई,राजकुमार भोसले, कावेरी विभूते,प्रा. गिरीधर तेलंगे, गणेश कवठाळे,विवेकानंद चिंचोले शिवराज मंडोळे, संतोष केंद्रे, ज्ञानदेव तेलंगे, नरसिंग राऊत, किशोर बरगाले सर, धोंडीराम तेलंगे, शुभम चिंचोले,आदिची उपस्थिती होती

## मध्य रेल्वे सिकंदराबाद-लोकमान्य टिळक टर्मिनस-सिकंदराबाद दुरंतो एक्सप्रेस सुधारित संरचनेसह चालवणार




**मुंबई/प्रतिनिधी :** मध्य रेल्वे ट्रेन क्रमांक १२२१९ / १२२२० लोकमान्य टिळक टर्मिनस-सिकंदराबाद-लोकमान्य टिळक टर्मिनस दुरंतो एक्सप्रेस सुधारित डब्बे संरचनेसह चालवणार आहे.

तपशील खालीलप्रमाणे :
ट्रेन क्रमांक १२२१९ / १२२२० लोकमान्य टिळक टर्मिनस-सिकंदराबाद दुरंतो एक्सप्रेस

सुधारित संरचना :
१ प्रथम वातानुकूलित, ४ वातानुकूलित द्वितीय, १२ वातानुकूलित तृतीय, २ जनरेटर कार आणि १ पॅन्ट्री कार. - (२० डब्बे)

ट्रेन क्रमांक १२२१९ दिनांक २५.०४.२०२६ पासून लोकमान्य टिळक टर्मिनस-सिकंदराबाद दुरंतो एक्सप्रेस सुधारित संरचनेसह चालवण्यात येईल.

ट्रेन क्रमांक १२२२० दिनांक २४.०४.२०२६ पासून सिकंदराबाद-लोकमान्य टिळक टर्मिनस दुरंतो एक्सप्रेस सिकंदराबादच्या सुधारित संरचनेसह चालवण्यात येईल.

या गाड्यांच्या तपशीलवार वेळा आणि थांब्यांसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.

# आतममग्न (स्वमग्न) मुलांच्या पालकत्व बाबत जिल्ह्यातील पहिली कार्यशाळा

**धाराशिव/प्रतिनिधी :** आपल्या पाल्यांच्या बौद्धिक व मानसिक वाढीत काही कमतरता, बदल किंवा वेगळेपणा जाणवत असल्यास पालकांनी त्याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. मूल एकटंच खेळत असेल, मित्रांमध्ये मिसळत नसेल, हाक मारली तरी प्रतिसाद देत नसेल, डोळ्यात डोळे मिळवत नसेल, लक्ष केंद्रित करत नसेल किंवा नीट बोलत नसेल, तर अशी लक्षणे स्वमग्नता अर्थात Autism Spectrum Disorder (ASD) ची असू शकतात. हा मुलांच्या मेंदूच्या विकासाशी संबंधित न्युरो-डेव्हलपमेंटल विकार असून साधारणपणे वयाच्या दोन ते तीन वर्षांपर्यंत त्याची लक्षणे दिसू लागतात. हा विकार संसर्गजन्य नाही तसेच पालकांच्या चुकीमुळे होत नाही, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

स्वमग्नतेमुळे मुलांच्या संवाद कौशल्यावर, सामाजिक वर्तनावर आणि एकूणच वागणुकीवर परिणाम होतो. अशा मुलांमध्ये हाक मारली तरी प्रतिसाद कमी देणे, इतर मुलांबरोबर खेळण्यात रस नसणे, भावना समजण्यात अडचण येणे, बोलायला उशीर होणे, शब्दांची किंवा वाक्यांची पुनरावृत्ती करणे, एकच हालचाल वारंवार करणे, चिडचिड किंवा रागाचे झटके येणे तसेच शालेय शिक्षणावर परिणाम होणे अशी लक्षणे आढळतात. प्रत्येक मुलामध्ये या विकाराची तीव्रता वेगवेगळी असू शकते.

या विकारासाठी कोणतीही विशिष्ट तपासणी उपलब्ध नसून तज्ञांच्या निरीक्षणातून निदान केले जाते. त्यामुळे लक्षणे दिसताच त्वरित तज्ञांचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक आहे. भारतामध्ये साधारणपणे २५० मुलांमागे एका मुलामध्ये हा विकार आढळतो. काही प्रमाणात अनुवंशिकता तसेच मोबाईल किंवा स्क्रीन टाइमचा अतिरेक कारणीभूत असू शकतो, मात्र याचे निश्र्चित कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. उपचारामध्ये बिहेविअरल थेरपी, स्पीच थेरपी आणि ऑक्युपेशनल थेरपी यांचा समावेश होतो आणि त्यात सातत्य ठेवणे अत्यंत महत्त्वाचे असते. तसेच पालकांचे समुपदेशनही मुलाच्या सर्वांगीण विकासासाठी गरजेचे ठरते.

बालरोगतज्ञ संघटना, जिल्हा परिषद दिव्यांग विभाग, जिल्हा शासकीय रुग्णालय, रोटरी क्लब धाराशिव Rotary Club Dharashiv, Forum for Autism Mumbai , डिस्ट्रिक्ट अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर, संयुक्त विद्यमाने तसेच ढरींर झुशी उेर्ींपळीू ऊर्ऱींशश्रेशिपीं ढ्रीर्ीी यांच्या सहकार्याने पालकांसाठी समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा दि. २७ फेब्रुवारी २०२७ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत नर्सेस ट्रेनिंग हॉल, सिव्हील हॉस्पिटल, धाराशिव येथे होणार आहे. या कार्यशाळेत तज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने तसेच पालकांना किट वाटप करण्यात येणार असून प्रवेश विनामूल्य आहे. गरजवंत पालकांनी या संधीचा अवश्य लाभ घ्यावा.

# धिरज देशमुख यांनी पाठवले मुख्यमंत्री व कृषिमंत्र्यांना पत्र

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीणमधील रेणापूर तालुक्यात २२ ते २४ फेब्रुवारी या कालावधीत वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. बऱ्याच भागात गारपिट झाल्याने शेतकऱ्यांच्या गहू, हरभरा, ज्वारी, करडी, ऊस व अन्य पिकांचे व फळबागांचे अतोनात नुकसान झाले आहे. लातूर जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान हे रेणापूर तालुक्यात झाले आहे. त्यामुळे रेणापूरमधील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरीव आर्थिक मदत करावी अशी मागणी माजी आमदार व लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी केली.




नुकत्याच झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीच्या पार्श्वभूमीवर माजी आमदार व लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि कृषीमंत्री श्री. दत्तात्रय भरणे यांना पत्र पाठवून शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदतीची मागणी केली आहे.


अवकाळी पाऊस, वादळी वाऱ्यामुळे काढणीला आलेली अनेक पिके डोळ्यादेखत भुईसपाट झाली आहेत. काढून ठेवलेल्या पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेला घास पुन्हा एकदा नैसर्गिक आपत्तीमुळे हिरावून गेल्याने शेतकरी हतबल झाला आहे. प्राथमिक अहवालानुसार रेणापुर तालुक्यातील ८ हजार हेक्टरहून अधिक जिरायती आणि ७०० हेक्टरहून अधिक बागायती आणि ३५ हेक्टरहून अधिक फळपीक क्षेत्राचे नुकसान झाले आहे. ही प्राथमिक माहिती असली तरी रेणापूर तालुक्यात नुकसानीचे प्रमाण नक्कीच जास्त आहे. याबाबतचे पंचनामे पूर्ण झाल्यानंतर अंतिम चित्र स्पष्ट होईलच. मात्र गेल्या तीन दिवसात झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपीट यामुळे लातूर जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान हे रेणापूर तालुक्यात झाले आहे. पिकांच्या व फळबागांच्या नुकसानीमुळे शेतकरी पूर्णतः खचला आहे. या नुकसानीची गांभीर्याने दखल घेऊन आपण शेतकऱ्यांना तातडीने भरीव आर्थिक मदत जाहीर करून दिलासा द्यावा अशी माझी मागणी आहे असे श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

# दयानंद विज्ञानमधील संगणकशास्त्र विभागाच्या पालक मेळाव्याला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागाच्या वतीने दि.२३ फेब्रुवारी २०२६ रोजी ' कोडिंगपासून करिअरपर्यंत... यशाचा नवा मार्ग ' या अनुषंगाने प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांच्या पालकांचा पालक मेळावा याचे आयोजन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आलेले होते.

या पालक मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे होते.याप्रसंगी आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार, संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे,विभाग समन्वयक डॉ. संगीता जाजू, प्रा.वैभव कुलकर्णी,प्रा. सुमित जोशी,पालक प्रतिनिधी वैद्यनाथ स्वामी व प्रा.कल्पना टपेकर यांची



प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी दयानंद शिक्षण संस्था व महाविद्यालय विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमी प्रयत्नशील असते.संस्थेचे व महाविद्यालयाचे नावलौकिक देशपातळीवर आहे. विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्याच्या दृष्टीने अद्ययावत संगणक लॅब,भौतिक सुविधा येथे उपलब्ध आहेत.विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालक,शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील समन्वय ही त्रीसूत्री अत्यंत महत्त्वाची आहे असे त्यांनी सांगितले तर डॉ.जमन अंगुलवार यांनी संगणकशास्त्र हा विषय आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचा असून पालकांनी विद्यार्थ्यांकडे सातत्याने लक्ष देऊन विद्यार्थी सोशल मीडिया व तंत्रज्ञानाचा योग्य वापर करतात का ? याकडे लक्ष देण्याची गरज आहे असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकातून डॉ.रोहिणी शिंदे यांनी संगणकशास्त्र विभागा अंतर्गत राबवले जाणारे विविध उपक्रम, ब्रिज कोर्स,रोबोटिक्स,सेमिनार गेस्ट लेक्चर,पोस्टर व मॉडेल प्रेझेंटेशन,युनिट टेस्ट व त्या परीक्षेचे महत्त्व सांगितले तर आभार प्रा.सुमित जोशी यांनी मानले.सूत्रसंचालन प्रा.अरुणा चौधरी यांनी केले.यावेळी पालक प्रतिनिधी वैद्यनाथ स्वामी यांनी पालकांनी आपल्या मुलांचा अभ्यास व त्यांचा दिनक्रम याकडे लक्ष देण्याची गरज आहे असे सांगितले तर प्रा.कल्पना टपेकर यांनी विद्यार्थी दररोज कॉलेजला जातो का ?,वर्गामध्ये त्याची उपस्थिती आहे का ? हे पाहून त्यांच्याशी दररोज संवाद साधला पाहिजे असे त्यांनी सांगितले.याप्रसंगी, डॉ.अमोल ठोसर, प्रा.सुजाता काळे, प्रा.दीप बिराजदार,प्रा. पुनम पाटे, प्रा.राजश्री चिलमे, प्रा.आशा बोराडे,प्रा.पुजा नंदगावे, प्रा.दीपाली दाडगे, संजय पांडे,प्रियंका हिप्परकर,मानसी गायकवाड, राजसाहेब पांचाळ यांच्यासह संगणकशास्त्र विभागातील इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

# अंकुर शिशूगृह सह्याद्री हॉस्पिटल येथे लग्नाचा वाढदिवस अनोखा पद्धतीने साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** माझा कनिष्ठ चिरंजीव प्रतिक व सून प्राशी यांच्या मंगलपरिणयाचा प्रथम वर्धापन दिन सह्याद्री अनाथ बालगृह धाराशीव येथे दिनांक २३/०२/२०२६ रोजी बालकांना खाऊच्या स्वरूपात मदत देऊन साजरा करण्यात आला.त्यावेळी आयु राजेंद्र धावारे, राजश्री धावारे, रोहित धावारे,प्रतिक्षा धावारे,गौरव धावारे, रुपाली धावारे, सेवानिवृत्त क्रीडा अधिकारी अशोकराव बनसोडे, रुग्ण कल्याण समिती सदस्य अब्दुल लतिफ, सेवानिवृत्त शिक्षक बलभीम कांबळे, पंकज कुलकर्णी,संकेत गायकवाड, डॉ दिग्गज दापके, डॉ फेरोज पल्ला,किरण मैडम उपस्थित होते.

अंकुर शिशूगृह सह्याद्री हॉस्पिटल येथे लग्नाचा वाढदिवस अनोखा पद्धतीने साजरा करण्यात आला .


धाराशिव येथील प्राशी प्रतिक धावारे यांनी आपल्या लग्नाच्या पहिल्या वाढदिवसानिमित्त अंकुर शिशूगृह सह्याद्री हॉस्पिटल येथे लग्नाचा वाढदिवस ० ते ६ वयोगटातील अनाथ बालकां सोबत साजरा केला.

यावेळी बालकांना लागणारे विविध प्रकारचे उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी सह्याद्री हॉस्पिटलचे संचालक डॉ मा. दिग्गज दापके देशमुख सर बोलताना म्हणाले की अशा नवीन पिढीतील युवकांनी




समाजात आदर्श निर्माण होईल असे काम केले पाहिजे. यावेळी राजेंद् धावारे सर , अबदूल लतिफ साहेब ( रुग्ण कल्याण समिती सदस्य ) ,अशोक बनसोडे साहेब ( माजी जिल्हा क्रीडा अधिकारी ), बलभिम कांबळे साहेब आणि अंकुर शिशूगृह येथील कर्मचारी व सेविका तसेच धावारे परिवारातील सर्व सदस्य , मित्र परिवार उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# दिव्यांगांनी लुटला सिध्देश्वर यात्रेचा मनमुराद आनंद

## देवस्थानच्यावतीने विद्यार्थ्यांना विनाशुल्क सोय

**लातूर/प्रतिनिधी :** ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने यात्रा महोत्सव सुरु आहे. या महोत्सवाचा आनंद घेण्यासाठी जिल्ह्यासह परजिल्हा व राज्यातील भाविक व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. दिव्यांनाही या यात्रेचा आनंद घेता यावा यासाठी देवस्थानच्या वतीने विशेष सोय करण्यात आली होती. लातूर येथील जीवन विकास प्रतिष्ठान संचलित सौ. सुशिलादेवी देशमुख मुलींच्या मुकबधीर विद्यालयाच्या १४८ विद्यार्थ्यांना विनाशुल्क यात्रा महोत्सवाचा मनमुराद आनंद लुटला आहे. यात्रेतील विविध खेळांचा आनंद घेतल्यानंतर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या चेहजयावरील आनंदाचे भाव देवस्थानचे प्रशासक व विश्वस्थांसाठी समाधान देणारा ठरला.





प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी महाशिवरात्रीचे औचित्य साधून श्री सिध्देश्वर देवस्थानच्या वतीने यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यातआले आहे. दि. २ मार्च पर्यंत हा महोत्सव सुरु राहणार आहे. महोत्सवाच्या निमित्ताने विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रम दररोज पार पडत आहेत. त्याच बरोबर यात्रा महोत्सवातील विविध खेळांचा आणि आकर्षक पाळण्यांचा आनंद घेण्यासाठी लातूर जिल्ह्यासह परजिल्हा व राज्यातील अनेक भाविक व नागरिक मोठ्या प्रमाणात गर्दी करत आहेत. यात्रेचा आनंद लुटता यावा याकरिता देवस्थानने सर्व सोयी व सुविधा उपलब्ध केलेल्याच आहेत. मात्र दिव्यांगानाही या यात्रा महोत्सवाचा आनंद लुटता यावा याकरिता देवस्थानचे प्रशासक व विश्वस्तांनी विशेष प्राधान्य दिलेले आहे. लातूर येथील जीवन विकास प्रतिष्ठान संचलित सौ. सुशिलादेवी देशमुख मुलींच्या मुकबधीर विद्यालयातील १४८ विद्यार्थ्यांना यात्रा महोत्सवासह आनंद मेळाव्याचा आनंद घेण्यासाठी विनाशुल्क सोय उपलब्ध करून दिली होती. सर्वप्रथम या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत श्री सिध्देश्वराची महाआरती करण्यात आली. यानंतर देवस्थानच्या वतीने नेमण्यात आलेल्या स्वयंसेवकांसोबत या दिव्यांग विद्यार्थ्यांनी यात्रेचा आनंद लुटण्यास सुरुवात केली. यात्रेतील विविध खेळ व आकर्षक पाळण्यांमध्ये बसत या विद्यार्थ्यांनी मनमुराद मौजमजाही केली. यानंतर दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी महाप्रसादाची सोयही देवस्थानच्या वतीने करण्यात आली होती. हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर, श्रअशोक भोसले, सुरेश गोजमगुंडे,रमेश बिसेन, विशाल झांबरे, ओम गोपे, महादेव खंडागळे, सिद्धेश्वर उकिरडे यांनी पुढाकार घेतला होता.

# समानता, स्वच्छता आणि शिक्षण हीच गाडगेबाबांची त्रिसूत्री – डॉ. विठ्ठल जाधव




**लातूर/प्रतिनिधी :** भुईसमुद्रा येथील दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित दयानंद विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिरात समानता, स्वच्छता आणि शिक्षण – गाडगेबाबांची त्रिसूत्री या विषयावर व्याख्यान उत्साहात संपन्न झाले. प्रमुख वक्ते म्हणून दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर येथील ग्रंथपाल डॉ. विठ्ठल विश्वनाथ जाधव यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. जाधव यांनी आपल्या भाषणात संत गाडगे बाबा यांच्या जीवनकार्याचा सविस्तर आढावा घेतला. समाजातील अंधश्रद्धा, विषमता आणि अन्याय दूर करण्यासाठी गाडगेबाबांनी कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती केली तसेच स्वच्छतेचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला, असे त्यांनी सांगितले. मानव सेवा हीच ईश्वर सेवा हा त्यांचा मूलमंत्र आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

समानतेची भावना जोपासणे, गावपातळीवर स्वच्छतेचे उपक्रम राबविणे आणि शिक्षणाचा प्रसार करणे ही काळाची गरज असून युवकांनी गाडगेबाबांच्या त्रिसूत्रीचा स्वीकार करून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश काटेकर, प्रा. तिवारी, प्रा. स्वाती पाटील, नागेश कुरे, श्री. माने तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनीही व्याख्यानाचा लाभ घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद बनसोडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन ऋतुजा कुलकर्णी यांनी केले. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, स्वच्छतेची भावना आणि सेवाभाव वृद्धिंगत झाल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# एनपीटीईएलमध्ये दयानंद विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एनपीटीईएल अंतर्गत आयोजित ' प्रोग्रामिंग इन जावा,फाऊंडेशन ऑफ आर सॉफ्टवेअर, डेटा स्ट्रक्चर अँड अल्गोरिदम डिझाईन आणि द जॉय ऑफ कॉम्प्युटिंग विथ पायथन ' या ऑनलाईन कोर्समध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेले आहे.

या कोर्समध्ये एकूण २२ विद्यार्थी आणि १ मेंटर यशस्वी झाले असून विद्यार्थ्यांनी विविध श्रेणींमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे.यामध्ये बिडवे अश्विनी, अंदुडगे ओमकार, साईसंतोष रावणगावे यांनी सुवर्णपदक पटकावले तर प्रा.सुमित जोशी,भालेकर ज्ञानेश्वर, मोहिनी खाडप, दयानंद सूर्यवंशी, लकाळ श्वेता, शिंदे पार्थ, पेटे रोहिणी, साईसंतोष रावणगावे (डेटा स्ट्रक्चर अँड अल्गोरिदम डिझाईन), साईसंतोष रावणगावे (फाउंडेशन ऑफ आर सॉफ्टवेअर), सृष्टी सूर्यवंशी, सृष्टी टोकळे, शुभम जाधव, रेनवकर श्वेता, सोमवंशी वर्षाराणी, विशाल लोमटे यांनी उल्लेखनीय कामगिरी करत रौप्यपदक मिळवले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांनी केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याबद्दल प्रा.सुमित जोशी यांना टॉप परफॉर्मिंग मेंटर म्हणून एनपीटीईएलकडून प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील एनपीटीईएल उपक्रमाचे यशस्वी समन्वयन केल्याबद्दल डॉ.अमोल ठोसर यांना ऍक्टिव्ह एस.पी.ओ.सी.म्हणून एनपीटीईएलकडून सन्मानित करण्यात आले.या सर्व यशस्वी प्राध्यापक व विद्यार्थ्यांना दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे, विभाग समन्वयक डॉ.संगीता जाजू, आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार, एनपीटीईएल समन्वयक डॉ. अमोल ठोसर, ए.आय.एम.एल. समन्वयक प्रा.वैभव कुलकर्णी, डेटा सायन्स आणि सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग समन्वयक प्रा. सुमित जोशी तसेच पालक प्रतिनिधी म्हणून वैद्यनाथ स्वामी आणि प्रा.कल्पना टप्पेकर उपस्थित होत्या. यावेळी विद्यार्थ्यांचे पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून अशा ऑनलाईन अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांचे तांत्रिक ज्ञान, प्रोग्रामिंग कौशल्य आणि संशोधनाची तयारी अधिक बळकट होते,असे मत व्यक्त केले. संगणकशास्त्र विभागाच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थी, मेंटर आणि समन्वयकांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

### ब्लॉक ..

फोन फ्रेंड कधी कधी
अचानक करी ब्लॉक
ना पाहिल्या मित्रांशी
अवचित थांबले टॉक

अस्वस्थ मन दुर्विचार
का केले मलाचं लॉक
भ्रामक बंद दरवाज्या
कितीवेळ करता नॉक

माझे काहीतरी चुकले
बसा देत स्वतांसशॉक
अ वास्तव रस्ता चाले
सुरु होतो स्काय वॉक

कुटुंबातीलं बोलतात
कानऐकत नाही हाक
एकांतवाटू लागे भला
नकोयं कुणाचा धाक

विश्वास नसे श्वासांवर
स्वताचं बंद करी नाक
न भेटल्या मित्रा साठी
खचवे स्वतां हकनाक

निवडून मित्र जमवावे
सन्मार्ग असतातलाख
स्वताचं आता ठरवावे
अंगार व्हावे का राख

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

### जाहीर प्रगटन

तमाम जनतेस विशेषत: लातूर जिल्हयातील उदगीर तालूक्यातील जनतेस या जाहिरप्रगटणा द्वारे कळवण्यात येत आहे की, माझे आशिल १.) श्री वैमव दिलीप बिरादार रा. शिरोळ (जानापुर) ता. उदगीर जि. लातुर आणि २.) कैलास कोंडीबाराव लांडगे रा. वानेगाव पोस्ट वाघी ता.जि. नांदेड या दोघांनी श्री. लक्ष्मण भिमराव पवार रा. डोंगरशेळकी ता.उदगीर जि. लातुर यांच्या नावे असलेले मौ. निडेबन ता. उदगीर जि. लातुर येथील ग्रामपंचायत मालमत्ता घर क्रं.२०५७ जमिन भु.क./ सर्व्हे न.३२/१ मधील प्लॉट नं. १६ क्षेत्र पुर्व-पश्चिम ३२ फुट, उत्तर-दक्षिण ५० फुट क्षेत्र १६००. चौ. फुट. (१४८.६९ चौ. मि.) ज्याची चर्तु:शिमा

| | |
|---|---|
| पूर्व- | प्लॉट नं. १५. |
| पश्चिम- | कोटलवार यांची जमिन. |
| दक्षिण- | २० फुटाचा रस्ता. |
| उत्तरेस- | प्लॉट नं. २०. |

वरील चर्तु: सिमेच्या आतिल प्लॉट माझ्या अशिलाने खरीदी घेण्याचे ठरवले आहे. आणि लेखी ठरावपत्र करून इसार / बयाना म्हणुन काही रक्कम अदा/दिलेली आहे. या प्लॉटचे मालक व ताबेदार श्री. लक्ष्मण भिमराव पवार रा. डोंगरशेळकी ता. उदगीर यांच्याशी वर नमुद प्लॉट बाबत कोणतीही संस्था / बैका / मंडळे किंवा वैयक्तिक शेजारी पाजारी / भाउ-बहिण, वारस इ. कोणाचेही देणे-घेणे, तारण, लिझ, गहाणखत कर्ज बोजा, करारपत्र, ठरावपत्र किंवा इतर कोणत्याही प्रकारचे देणे-घेणे-येणे किंवा कसल्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार असल्यास सदर चे जाहिर प्रकटण प्रकाशित झाल्यापासुन पासुन ८ दिवसाच्या आत वर नमुद प्लॉट विषयी काही संबंध असल्यास मुळ कागदपत्रासह लेखी उजर/ तकार ऑफिसला येउन कळवावे. मुदतीत तक्रार / उजर नाही आल्यास सदर चा प्लॉट हा निर्वीवाद असल्याचे समजुन माझे अशिल सदर प्लॉटच्या खरेदी बाबत आर्थिक व्यवहार करतील. याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रकटण उदगीर येथुन देण्यात येत आहे.

**जाहिर प्रगटण देणार**
**१. वैभव दिलीप बिरादार**
**२. कैलास कोंडिबा लांडगे**

**तर्फे**
**ॲड. डॉ. श्रवणकुमार माने**
**वरिष्ठ विधीज्ञ उदगीर**

## राज्य शासनाच्या विविध कृषी पुरस्कारांसाठी

# ऑनलाईन संगणक प्रणाली सुरू

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य कृषी उत्पादन व कृषी उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत दरवर्षी शेती व पुरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, व्यक्ती व संस्थांचा सन्मान विविध पुरस्कार देऊन केला जातो. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रीय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार यांचा समावेश आहे. हे पुरस्कार माननीय राज्यपाल यांच्या शुभहस्ते प्रदान केले जातात.

यापूर्वी या पुरस्कारांसाठी ऑफलाईन पद्धतीने चार प्रतींमध्ये प्रस्ताव सादर करावे लागत होते. यामुळे प्रस्ताव तयार करण्यासाठी खर्च येत असल्याने सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. तसेच प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पारंपरिक पद्धतीच्या अडचणी दूर करण्यासाठी कृषी विभागाने पुरस्कार प्रस्ताव प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या उद्देशाने स्वतंत्र ऑनलाइन संगणक प्रणाली विकसित केली आहे.

ही प्रणाली कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://krishi.maharashtra.gov.in वर 'कृषी पुरस्कार' टॅबमध्ये उपलब्ध आहे. या डिजिटल प्रणालीद्वारे पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन राबविली जाणार आहे. यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढेल आणि प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्र्वासार्हता व परिणामकारकता अधिक मजबूत होईल.

**शेतकऱ्यांना होणारे प्रमुख फायदे**

* घरबसल्या ऑनलाइन अर्ज सादर करता येणार.
* ऑफलाइन चार प्रती प्रस्ताव तयार करण्याचा वेळ व खर्च वाचणार.
* एकदाच अपलोड केलेली कागदपत्रे पुन्हा सादर करण्याची गरज नाही.
* अर्ज कुठल्या टप्प्यावर आहे याची माहिती सहज उपलब्ध होणार.
/ छपाई, झेरॉक्स, प्रवास व पोस्ट खर्च कमी होऊन आर्थिक भार कमी होणार.

इच्छुक शेतकरी, व्यक्ती, संस्था व गट यांना सन २०२५ पासूनचे विविध कृषी पुरस्कारांसाठी अर्ज ऑनलाइन संगणक प्रणालीद्वारे सादर करण्याचे आवाहन कृषि आयुक्त यांनी केले आहे.

तरी इच्छुकांनी तात्काळ अर्ज सादर करावा, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी कळविले आहे.

# दयानंद कलाचे विद्यार्थी साहित्योत्सवात रममाण



**लातूर/प्रतिनिधी :** नुकत्याच संपन्न झालेल्या अखिल भारतीय साहित्य परिषद पुरुस्कृत, साहित्य भारती आणि श्री. सरस्वती भुवन शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने छ.संभाजीनगर येथे 'साहित्योत्सव' मध्ये दयानंद कला महाविद्यालयाच्या ४० विद्यार्थी आणि ६ प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला. या साहित्योत्सवात सृजनात्मक लेखनाला चालना मिळावी म्हणून विद्यार्थ्यांसाठी निबंध, कविता, कथा, नाट्यछटा इत्यादी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कविता, कथा व निबंध स्पर्धेत सहभाग नोंदविला. कविता लेखनामध्ये रवी वाघमारे या विद्यार्थ्यास उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. साहित्योत्सवात संपन्न झालेल्या विविध सत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवून साहित्यस्वाद घेतला तसेच विविध वक्त्यांना भेटून शंकांचे निरसन करुन घेतले. साहित्योत्सवात मराठवाडा प्रदेश आणि इतर ठिकाणच्या विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. परंतु एकमेव दयानंद कला महाविद्यालयातील सुमारे ४० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून साहित्यनिर्मितीत भाग घेतल्यामुळे सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे संयोजकाकडून गोड कौतुक करण्यात आले. या साहित्योत्सवास महाविद्यालयाने साहित्योत्सव शैक्षणिक सहल असे शीर्षक देऊन विद्यार्थ्यांना साहित्यस्वादाची संधी दिली. विद्यार्थ्यांसोबतच मराठी विभागातील डॉ. सुनीता सांगोले, डॉ. अंकुशकुमार चव्हाण, डॉ. सुभाष कदम, प्रा. राजकुमार मोरे, प्रा. अंगद भुरे आणि प्रा. विद्या गिराम इ. प्राध्यापक सहभागी झाले होते. या उपक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी प्रोत्साहन दिले.

# मोकाट श्वानांच्या हल्ल्यांमुळे शाळकरी मुले, वृद्ध हवालदिल

**उदगीर/प्रतिनिधी :** उदगीर तालुक्यातील हंडरगुळी आणि हाळी या दोन मोठ्या गावांतील गल्लीबोळांत सध्या मोकाट आणि चर्मरोग झालेल्या मोकाट श्वानांनी उच्छाद मांडला आहे. गल्लोगल्ली रात्रंदिवस श्वानांचा कल्ला आणि निष्पाप नागरिकांवर होणारे हल्ले यामुळे महिला, शाळकरी मुले आणि वृद्धांमध्ये कमालीची दहशत निर्माण झाली आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे एखादा मोठा अनर्थ घडल्यावरच ग्रामपंचायत जागी होणार का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

नांदेड-बिदर राज्यमार्गावर मांस विक्रेते आणि हॉटेल व्यावसायिक टाकत असलेले 'वेस्टेज' अन्न व मांस खाण्यासाठी श्वानांचे मोठे जमाव जमतात. हे अन्न खाल्ल्यामुळे श्वान अधिक हिंसक आणि रागीट बनत आहेत. अनेकदा रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनधारकांनाही ही श्वान धडकतात, ज्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. विशेष म्हणजे, बाहेरून १०० हून अधिक श्वान आणून या परिसरात सोडल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे.


SRM E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

The Superintending Engineer (Parli Circle) on behalf of MSETCL (the Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on Mahatransco E-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| S.N. | Particular of Works | SRM E-Tender No. | SRM E-Tender RFx No. |
|---|---|---|---|
| 1 | Providing Outsource Manpower at EHV O&M Circle, Parli-V, (Latur, Nanded, Girwali, Kumbhargaon) | SE/EHVC/PV/HR/2026-27/T-02 | 7000038963 |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in**.
**Contact Person:** The Executive Engineer (O): Phone No. (02446)222076. The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Parli-V.**

टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लब मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade    Mo. 9422472502,    RNI 47034/64,    POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे.    मुख्यसंपादक: दयानंद शंकर जडे  मो. ९४२२४७२५०२    आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६